क्र. ४९३

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय आ. वा.
दा. क्र. ३०९८

आ. वा.
दा. क्र. ३०९८

आ. वा. ४९३
१४८५
२३।१०।५३

# गणपति

## प्रमुख अवतार व आराधना


लेखक

अनंत वासुदेव मराठे

प्रकाशक

निर्णयसागर प्रेस, मुंबई नं. २

किंमत १। रुपया



ॐ नमोजी गणनायका । सर्वसिद्धिफलदायका ॥
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥ १ ॥

—श्री समर्थ रामदास

◆◆◆

# दोन शब्द

श्रीगणेश देवतेचें माहात्म्य वर्णन करणाऱ्या श्रीगणेश-पुराण, मुद्गलपुराण इत्यादींतील श्रीगणेशावताराच्या कथा, तत्संबंधीं उद्बोधक माहिती आणि सर्वसामान्य लोकांना सहज करतां यावा असा आवश्यक तेवढा आराधनेचा भाग एवढे विषय या छोट्या पुस्तकांत दिले आहेत. हा प्रयत्न लोकांना आवडला तर निरनिराळ्या देवतांसंबंधीं अशींच छोटीं पुस्तकें लिहिण्याचा विचार आहे.

मिति भाद्रपद शु० ४
१८७१
७८
१९४९

—लेखक

# —अनुक्रमणिका—


| | पृष्ठ |
|---|---|
| उपाद्घात ... ... ... | १ |
| प्रमुख अवतार— | |
| १ कश्यपपुत्र विनायक ... ... | ४ |
| २ पार्वतीपुत्र गजानन आणि गणेश ... | ६ |
| ३ अष्टविनायक ... ... ... | ११ |
| ४ आणखी कांहीं कथा... ... ... | २४ |
| ५ श्रीगणपति आणि चंद्र ... ... | ४० |
| ६ श्रीगणपति आणि उंदीर ... ... | ४३ |
| ७ श्रीगणपति आणि दूर्वा ... ... | ४५ |
| ८ श्रीगणपतीचें ऐतिहासिक व आध्यात्मिक स्वरूप ... ... ... | ४९ |
| समारोप ... ... ... | ५६ |
| सार्थ व संक्षिप्त पूजा ... ... | ५९ |
| श्रीगणेश–अष्टोत्तरशतनामावलि ... ... | ८१ |
| आरत्या व पदें ... ... ... | ८३ |
| नमन–प्रार्थना ... ... ... | ८६ |

ॐ

# गणपति

## प्रमुख अवतार व आराधना

## भाग १ ला

### उपोद्घात

हिंदुधर्माचें मूळ तत्त्व **परमेश्वर एकच आहे** आणि वेगवेगळे लोक आपापल्या प्रकृतिभेदानुरूप वा समजुतीप्रमाणें त्याचीं वेगवेगळीं रूपें कल्पितात (एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति) असें आहे. त्याचप्रमाणें पृथ्वीवर अधर्म माजला म्हणजे धर्मसंस्थापना करण्यासाठीं परमेश्वर पृथ्वीवरच्या एकाद्या प्राण्याच्या रूपानें **अवतार** घेतो व आपलें कार्य पुरें झालें कीं पुनः मूलतत्त्वांत विलीन होतो हें हिंदुधर्माचें दुसरें तत्त्व आहे.

या तत्त्वाप्रमाणें श्रीगणेश अथवा गणपति हा परमेश्वराचा अवतार विशिष्ट कारणासाठीं झाला – एकदांच नव्हे, अनेकदां झाला, असें पुराणांतरीं वर्णन आहे.

श्रीगणपति, गणेश, गुणेश, गजानन, विनायक इत्यादि नांवांनीं ही देवता प्रसिद्ध असून निदान अडीच तीन हजार वर्षांपूर्वींपासून तरी तिचा ग्रंथांतरीं उल्लेख आढळतो आणि आज नेपाळपासून रामेश्वरपर्यंत गणपतीचें स्थान नाहीं असें स्थळ आढळावयाचें नाहीं एवढी तिची लोकप्रियता आहे.

आम्ही कोणत्याही शुभकार्याचा आरंभ "श्रीगणेशाय नमः" म्हणून करतों आणि 'श्रीगणेशा' म्हणजे आरंभ हा मराठी भाषेचा सांप्रदायच होऊन राहिला आहे.

श्रीगणपतीचीं रूपेंही विविध प्रकारचीं वर्णिलेलीं आहेत. एक ते दहा मुखें; दोन ते वीस हात; हातांतील आयुधांचे व इतर वस्तूंचे विविध प्रकार; नृत्य करणारी अगर बसलेली मूर्ति; उंदीर, सिंह, मयूर, अशीं भिन्न वाहनें; पांढरा, पिंवळा, तांबडा असे भिन्न रंग; सिद्धि-बुद्धि या शक्तींसह किंवा एकाकी मूर्ति असे प्रकार पुराणांतून वर्णिलेले आहेत. सध्यां प्रचलित असलेला व भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशीं प्रायः सर्वत्र पूजिला जातो तो प्रकार म्हणजे एकमुखी (गजमुखी), चतुर्हस्ती, अंकुश अगर पुष्पधारी आसनस्थ मूर्ति आणि जवळ त्याचें प्रिय वाहन उंदीर, हा होय. या मूर्तीचा रंग बहुधा पांढरा, गौर किंवा तांबडा असतो. नेसावयाच्या किंवा अंगावरील वस्त्राच्या बाबतींत 'जशीं माणसें तसे त्यांचे देव' या नियमाप्रमाणें भिन्न भिन्न प्रकार आढळतात आणि स्वतःची आवड अगर सौंदर्यदृष्टि हेंच या बाबतींत निर्णायक प्रमाण असलेलें आढळतें.

श्रीगणपतीच्या नांवांसंबंधानेंही तसेंच. हीं नांवें बहुतेक गुणदर्शक आहेत. त्यांतलीं बारा तर विशेषच पुण्यकारक मानलीं जातात. तीं येणेंप्रमाणें—

**प्रथमं वक्रतुंडं च एकदंतं (एकदंष्ट्रं) द्वितीयकम् ।**
**तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम् ॥**
**लंबोदरं पंचमं च षष्ठं विकटमेव च ।**
**सप्तमं विघ्नराजेंद्रं धूम्रवर्णं तथाऽष्टमम् ॥**

**नवमं भालचंद्रं च दशमं तु विनायकम् ।**
**एकादशं गणपतिं द्वादशं तु गजाननम् ॥**

यांच्या पठनाचें फळ पुढीलप्रमाणें सांगितलें आहे –

**एतानि द्वादश नामानि त्रिसंध्यं यः पठेन्नरः ।**
**न च विघ्नभयं तस्य सर्वसिद्धिकरं प्रभो ॥**

म्हणजे या सर्वसिद्धिदात्या प्रभूचीं हीं नांवें जो मनुष्य सकाळ, दुपार नि संध्याकाळ अशा तीन वेळां पठन करतो त्याला कोणत्याही विघ्नाचें भय नाहीं.

**सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णकः ।**
**लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः ।**
**धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचंद्रो गजाननः ॥**

अशीं बारा नांवेंही दुसऱ्या एका पाठांत आहेत. आणि त्यांच्या पठनाची फलश्रुती–

**द्वादशैतानि नामानि यः पठेत् शृणुयादपि ।**
**विद्यारंभे विवाहे च प्रवेशे निर्गमे तथा ।**
**संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते ॥**

म्हणजे विद्यारंभ, विवाह, प्रवेश, निर्गम, संग्राम अथवा इतर कोणत्याही संकटाच्या वेळीं या नांवांचें पठन किंवा निवळ श्रवण झालें असतांही विघ्न नाहींसें होतें, अशी सांगितली आहे.

या नांवांपैकीं विनायक नांवाचा अवतार कृतयुगांतला असून त्रेतायुगांतला मयूरेश्वर, द्वापारयुगांतला गजानन आणि कलियुगांतला धूम्रकेतु असें सांगितलें आहे. पण सध्यांच्या कलियुगांत सुद्धां विनायक, गणेश आणि गजानन या नांवांचे अवतारच सर्वत्र पूजिले जातात. इतरांचें माहात्म्य त्या त्या स्थानापुरतेंच असतें. म्हणून या तीन अवतारांच्या कथा प्रथम देऊं.

१

# कश्यपपुत्र विनायक

श्रीगणपतीचा पहिला अवतार **विनायक** हा असून तो **कश्यप** व **दिति** यांचा पुत्र होय.

कश्यप ऋषि हा मोठा पुण्यवान्, तपस्वी व जितेंद्रिय होता. दितीही मोठी सुंदर व गुणवती होती. तिला हा मुलगा झाला तेव्हां त्याचें नांव **महोत्कट** असें ठेविलें होतें. श्रीकृष्णाप्रमाणें लहानपणींच या मुलानें कित्येक राक्षस-राक्षसींचा वध केल्याच्या कथा गणेश व मुद्गल पुराणांत दिलेल्या आहेत.

महोत्कट पांच वर्षांचा झाल्यावर कश्यपानें त्याची मुंज केली. तींत भिक्षावळीच्या वेळीं ब्रह्मदेवानें त्याला एक सर्वकाळ फुललेलें राहाणारें कमळ दिलें, व त्याचें नांव **ब्रह्मणस्पति** असें ठेविलें. कुबेरानें आपल्या गळ्यांतील माळ देऊन त्याचें नांव **सर्वप्रिय** असें ठेविलें. शंकरानें त्रिशूळ नि डमरू देऊन त्याचें नांव **भालचंद्र** असें ठेविलें. अशाच रीतीनें समुद्र, शेष, वायु इत्यादिकांनीं कोणीं कांहीं कोणीं कांहीं अशा वस्तु देऊन त्याचीं वेगवेगळीं नांवें ठेविलीं. पण या वेळीं इंद्र मात्र उपस्थित असूनही महोत्कटाला कांहींच भिक्षावळ न घालतां तटस्थ राहिला. तेव्हां कश्यप इंद्राला म्हणाला—"हा प्रत्यक्ष परमात्मा सगुण-

१२०८५ २३।१०।८३

रूपानें माझ्या घरीं अवतीर्ण झाला आहे; त्याच्याशीं जो विरोध करील त्याचा नाश झाल्याखेरीज राहणार नाहीं."

कश्यपाचें हें भाषण ऐकून इंद्र शेजारींच बसलेल्या वायूस म्हणाला, "वायो, याचा पराक्रम काय आहे तो पाहूं या. याला आकाशांत उडवून दे बघूं!"

तेव्हां वायु आपलें सर्व बळ एकत्र करून त्याला उडविण्यासाठीं जोरानें वाहूं लागला. त्याच्या जोरानें मोठमोठे वृक्ष उमळून पडले, पर्वत हालूं लागले, आणि आतां प्रलयकालच होतो कीं काय असें सर्वांना वाटलें. पण हा बटू मात्र जाग्यावरून तिळमात्र हालला नाहीं!

नंतर इंद्रानें अग्नीला सांगितलें, "याला जाळून टाक!" तेव्हां अग्नीनेंही आपलें भयंकर रूप प्रगट केलें, आणि जें कांहीं त्याच्या तडाक्यांत सांपडलें तें जाळीत सुटला! पण या बटूनें त्या अग्नीलाच एकदम गिळून टाकलें!

वायु व अग्नि यांच्या हातून महोत्कटाचा पाडाव होत नाहीं असें पाहून इंद्र अधिकच रागावला व तो आपले सहस्र नेत्र उघडून महोत्कटाकडे पाहूं लागला. पण काय चमत्कार सांगावा? तो बटू त्या तेजानें भयभीत तर झाला नाहींच, उलट इंद्रालाच त्याच्या ठिकाणीं असंख्य नेत्र, असंख्य मस्तकें, असंख्य हात व असंख्य पाय आहेत असें दिसून आलें. त्याच्या नेत्रांमध्यें चंद्रसूर्य वास करीत आहेत व सर्व ब्रह्मांडें त्याच्या तोंडांत आहेत असें इंद्राला आढळून आलें आणि त्याचें तें विश्वरूप पाहतांच इंद्राचा गर्वपरिहार होऊन त्यानें त्याला आपल्या हातांतील अंकुश व कल्पवृक्ष देऊन त्याचें **विनायक** असें नांव ठेविलें.

या विनायकानें पुढें देवान्तक व नरान्तक या राक्षसांचा वध केल्याच्या कथा पुराणांत सुरस रीतीनें वर्णिल्या आहेत आणि 'विनायक-माहात्म्यां'त या विनायकाच्याच सात अवतारांच्या कथा दिल्या आहेत.

२

# पार्वतीपुत्र गजानन आणि गणेश

**गजानन** या अवताराची कथा अशी आहे कीं, पार्वती एकदां स्नानाला बसली असतां तिनें आपल्या अंगाचा मळ काढून त्याची गणेश-मूर्ति बनविली आणि ती द्वाररक्षक म्हणून दारावर ठेवून दिली.

द्वारावर ठेवलेला हा रक्षक सजीव होऊन पुढें शंकरालाही आंत जाऊं देईना, तेव्हां शंकरानें त्याचें डोकें उडविलें ! पार्वती शोक करूं लागली तेव्हां मग शंकरानें नजीकच एक हत्ती होता त्याचें डोकें कापून आणून गणेशाच्या धडावर बसविलें. त्यामुळें तो **गजमुख** किंवा **गजानन** झाला !

दुसऱ्या एका कथेप्रमाणें गणेश हा द्वारपालाचें काम करीत असतां हत्तीच्या शिरासारखें शिर असलेल्या **गजासुर** या नांवाच्या असुरानें शंकराचा कमंडलू लाथाडून त्याचा अपमान केला; पण हें कृत्य गणेशानेंच केलें अशा समजुतीनें शंकरानें त्याचा शिरच्छेद केला आणि पुढें पार्वतीकडून खरी हकीकत समजल्यावर त्यानें गजासुराला मारून त्याचें शिर गणपतीच्या धडावर ठेवून चिकटविलें.* त्या वेळेपासून त्याला **गजानन** हें नांव पडलें.

*माणसाच्या धडावर इतर प्राण्यांचीं शिरें बसविल्याच्या आणखीही कथा पुराणान्तरीं आहेत.

दधीचि ऋषीनें अश्विनीकुमारांस गुप्त मधुविद्या शिकविण्याकरतां

तिसरी कथा अशी आहे कीं, सिंदुरासुर नांवाच्या दैत्यानें पार्वती गर्भवती असतां सूक्ष्मरूपानें तिच्या उदरांत प्रवेश करून बालकाचें शिरच छेदून टाकलें. पुढें पार्वती प्रसूत झाली तों बालक निःशिर ! सारे देव जमा झाले; जो तो आश्चर्य करूं लागला. इतक्यांत त्या बालकाच्या कंठांतून वाणी निघाली कीं, 'सिंदूर नांवाच्या दैत्यानें वायु-रूप घेऊन आठव्या महिन्यांतच माझें शिर कापून नेलें, पण मीं त्याचा संहार करण्यासाठींच अवतार घेतला आहे.' तेव्हां नारदमुनि जवळच होते ते म्हणाले, "आपल्या शिराच्या ठिकाणीं काय योजना करावी ? आम्हांला कांहीं कळत नाहीं."

नारदानें असें म्हणतांच त्या बालकाच्या मस्तकाच्या ठिकाणीं गजमस्तक दिसूं लागलें आणि सर्व देवांनीं त्याचें गजानन असें नांवठेविलें.†

---

**घोड्याचें** शिर आपल्या धडास लावून घेतलें होतें. इंद्राला हें कळतांच त्यानें दधीचीचें शिर उडविलें. पण अश्विनीकुमारांनीं त्यास पूर्वीचें शिर पुनः बसविलें.

एकदां रुद्रगणांनीं दक्षाचें शिर उडविलें. तेव्हां रुद्रानें दक्षाच्या धडावर **अजाचें** म्हणजे **बोकडाचें** शिर बसविलें.

त्याचप्रमाणें ब्रह्मदेवाचें एक शिर रुद्रानें उडविलें, त्यामुळें तो मूळचा पंचमुख होता तो चतुर्मुख झाला.

हिरण्यकशिपूच्या वधानंतर नरसिंहाचें उग्र रूप शांत होईना, तेव्हां शिवानें शरभाचें रूप घेऊन त्याचें शिर उडविलें, त्या वेळीं त्या शिरांतून नारायण ऋषि व धडांतून नर ऋषि असे नरनारायण बाहेर पडले अशी कथा आहे.

---

† प्रकरण ४ पृष्ठ २७ पहा.

**गणेशाचा** अवतार सिंधु दैत्याला मारण्यासाठीं झाला होता. त्याची पुराणान्तरीं कथा आहे ती अशी–

**सिंधु** या नांवाचा एक दैत्य होता. तो समुद्रांत उत्पन्न झाला म्हणून त्याला सिंधु हें नांव ठेवलेलें होतें. तो मोठा झाल्यावर त्यानें सूर्याची आराधना केली. सूर्य प्रसन्न झाला तेव्हां सिंधूनें त्याच्याकडे अमरत्व मागितलें. सूर्य म्हणाला, "तूं अमरत्व मागतोस खरें; पण जो जन्माला आला त्याला मृत्यु हा यावयाचाच. तथापि ज्या अर्थीं तुझ्यावर मला कांहीं तरी अनुग्रह केलाच पाहिजे त्या अर्थीं मी तुला असा वर देतों कीं, सध्यां असलेले देव, मनुष्य, श्वापदें, नाग यांच्यापासून किंवा दिवसा, रात्रीं, पहांटे, संध्याकाळीं इतक्या वेळीं तुला मृत्यु येणार नाहीं. मी तुला अमृत देतों तें तूं आपल्या उदरांत ठेवून दे. हें तुझ्या उदरांत असेपर्यंत तुला मृत्यु येणार नाहीं."

पुढें या वराच्या जोरावर सिंधूनें सर्व पृथ्वी जिंकली आणि इंद्रलोकावरही स्वारी केली. इंद्राचें नि त्याचें युद्ध झालें आणि त्यांत इंद्राचा पराभव होऊन तो आश्रयार्थ श्रीविष्णूकडे पळून गेला. विष्णूनें इंद्राला अभय देऊन स्वतः सिंधु दैत्याशीं लढण्याची तयारी केली आणि तो आपली सारी देवसेना घेऊन इंद्रलोकीं आला. तेथें सिंधूचें नि श्रीविष्णूचें घनघोर युद्ध झालें. विष्णूनें सिंधूवर सोडलेलें चक्र सिंधूनें आपल्या चक्रानें हाणून पाडलें आणि विष्णूच्या गदेचे आपल्या दांतांनीं चावून तुकडे केले ! श्रीविष्णूनें पाहिलें कीं, याच्याशीं लढून हा आटोपावयाचा नाहीं. तेव्हां सिंधूच्या पराक्रमानें आपण संतुष्ट झालों असें दाखवून विष्णु त्याला म्हणाला–"तुझ्या पराक्रमानें मी संतुष्ट झालों आहें. पाहिजे तो वर माग !" सिंधु म्हणाला–"तुझ्याकडे वर काय मागावयाचा ?

पण देणारच असशील तर हें युद्ध सोडून तूं माझ्या गंडकी नामक नगरांत जाऊन रहा."

श्रीविष्णूला तें मान्य करणें भागच होतें. तेव्हां सिंधूनें त्याला व इतर सर्व देवांना गंडकी नगरींत नेऊन नजरकैदेंत ठेविलें.

अशीं बरींच वर्षें गेलीं. देवांच्या राजधान्यांतून सर्वत्र सामसूम झालें होतें. तिन्ही लोकीं सिंधु दैत्याचा दरारा बसलेला होता. त्याच्या त्रासांतून कसें सुटावें याचा मार्ग कोणाला सुचत नसे. खुद्द श्रीशंकरसुद्धां कैलास पर्वत सोडून मेरू पर्वतावर जाऊन राहिला होता. तिथें पार्वतीनें बारा वर्षें तपश्चर्या केल्यावर तिला मुलगा झाला, त्याचें नांव गणेश.

या अवतारांत श्रीगणेशानें अनेक राक्षसांचा संहार करून शेवटीं प्रत्यक्ष सिंधूशीं गांठ घातली. या वेळीं शंकराचे अनेक गण श्रीगणेशाच्या साह्यार्थ त्याच्याबरोबर होते. सिंधूनें त्या सर्व गणांचा पराभव करून त्यांना धुळीस मिळविलें. शेवटीं श्रीगणेश व सिंधु यांची हातघाईची लढाई जुंपली. गणेशानें आपला परशु फेंकून सिंधूचा एक हात तोडला. तेव्हां सिंधु दुसऱ्या हातांत तलवार घेऊन गणेशावर धांवला. पण या वेळीं काय चमत्कार सांगावा? सिंधूला जिकडे तिकडे गणेशच गणेश दिसूं लागले. तेव्हां तो भांबावून गेला व शेवटीं युद्धभूमि सोडून पळून गेला!

सिंधूची दुर्गा नांवाची बायको होती. तिनें सिंधूला हें युद्ध सोडून गणेशाला शरण जाण्याची विनंति केली. पण सिंधूनें ती मानली नाहीं. आपल्या तुटक्या हातावरून एक वस्त्र गुंडाळून घेऊन सिंधु पुनः युद्धभूमीवर गेला. पण याही वेळीं त्याचा पराभव होऊन त्याला माघारें फिरावें लागलें.

यानंतर गणेशानें सिंधूच्या गंडकी नगरीवर चाल केली आणि तेथें एकाएकीं विराट् स्वरूप धारण करून सिंधूला भयचकित करून सोडलें. मस्तक आकाशाला भिडलेलें आणि पायांनीं पाताळाचा ठाव घेतलेला, सर्व देह हजारों मस्तकें नि हजारों नेत्र यांनीं भरलेला असें तें स्वरूप पाहून सिंधुदैत्य गडबडून गेला. इतक्यांत गणेशानें सिंधू्या नाभीचा नेम धरून आपला परशु त्याच्यावर फेंकला. त्याच्या नाभींत अमृत होतें तें बाहेर पडतांच सिंधु तोंड वासून रक्त ओकत खालीं पडला व तत्काळ गतप्राण झाला !

अशा रीतीनें सिंधुहननाचें कार्य पुरें झाल्यावर श्रीगणेशानें सुरलोकीं गमन केलें.

३

# अष्टविनायक

श्रीगणेशोपासना प्राचीन कालापासून अखिल हिंदुस्थानांत चालू आहे. हिंदुस्थानच्या बाहेरही कित्येक देशांत ती पूर्वकाळीं चालू होती असें त्या देशांतील अलीकडच्या संशोधनावरून सिद्ध झालें आहे. महाराष्ट्रांत या उपासनेची व्याप्ति इतर ठिकाणांपेक्षां अधिक आहे. सुप्रसिद्ध अष्टविनायकांचीं स्थानें सर्व महाराष्ट्रांतच आहेत. हीं स्थानें मंगलाष्टकाच्या एका श्लोकांत दिलीं आहेत तीं अशीं—

**स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं ।**
**बल्लाळं मुरुडं विनायकमढं चिंतामणिं थेवरं ॥**
**लेण्याद्रिं गिरिजात्मकं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरं ।**
**ग्रामे रांजणसंस्थिते गणपतिं कुर्यात् सदा मंगलं ॥ १ ॥**

याचाच दुसरा पाठभेद आहे तो असा—

**स्वस्ति श्रीगणनायको गजमुखो मोरेश्वरं सिद्धिदं ।**
**बल्लाळं मुरुडं विनायकमढं चिंतामणिं स्थेवरे ॥**
**लेण्याद्रौ गिरिजात्मकं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरे ।**
**ग्रामे रांजणसंस्थितो गणपतौ दद्यात् वयोमंगलं ॥ १ ॥**

या दोन्ही पाठांतील व्याकरणदोष बाजूला ठेवून त्यांतील श्रीगणपतीचीं-विनायकाचीं नांवें व स्थानें सांगतां येतात तीं अशीं—

( १ ) **श्रीमयूरेश्वर** तथा **मोरेश्वर**[1]—मोरगांव [ जेजुरीपासून पांच कोसांवर कऱ्हा नदीचे कांठीं ]

( २ ) **श्रीसिद्धिविनायक**—सिद्धटेक [ डिकसाळ स्टेशनजवळ भीमेच्या कांठीं ]

( ३ ) **श्रीबल्लाळेश्वर**—पाली [ कुलाबा जिल्ह्यांत नागोठण्यापासून सात मैलांवर ]

( ४ ) **श्रीविनायक**—महढ तथा मढ [ मुंबई-पुणें रस्त्यावर कर्जत-खोपवली-नजिक ]

( ५ ) **श्रीचिंतामणि**—थेऊर [ पुणें जिल्ह्यांत लोणी स्टेशनपासून तीन मैलांवर मुळा-मुठा नदीचे कांठीं ]

( ६ ) **श्रीगिरिजात्मक**—लेण्याद्रि [ जुन्नरनजीकच्या एका डोंगरांत ]

( ७ ) **श्रीविघ्नेश्वर**—ओझर [ पुणें जिल्ह्यांत खेडपासून पांच कोसांवर ]

( ८ ) **श्रीगणपति**—रांजण [ उरळी स्टेशनपासून पांच कोसांवर घोडनदीचे रस्त्यावर ]

---

१ **कऱ्हेचे तिरीं एक से मोरगांवू ।**
**तिथें नांदतो मोरया जाण पाहूं ॥**
**चला जाउं यात्रे महापुण्य आहे ।**
**मनीं इच्छिलें मोरया देत आहे ॥ १ ॥**

हा श्लोक प्रस्तुत लेखकाच्या आजोबांकडून त्याला लहानपणीं शिकविण्यांत आला होता. हे आजोबा सांगत, तो आपल्याला त्यांच्या आजोबांनीं लहानपणीं शिकविला होता. अशा रीतीनें निदान पांच पिढ्यांपूर्वींपासून हा प्रचलित आहे असें दिसतें.

श्रीगणेशपुराण, विनायकमाहात्म्य, चिंतामणिविजय[1] इत्यादि ग्रंथांतून या अवतारांचें सविस्तर वर्णन दिलें आहे. त्याचा सारांश येणें-प्रमाणें—

( १ ) **श्रीमयूरेश्वर** ( मोरेश्वर )—'कमलासुर' नांवाच्या दैत्याला मारण्यासाठीं हा अवतार झाला. याचें मूळचें नांव 'बल्लाळ' असें होतें. कमलासुराची नि त्याची लढाई जुंपली तेव्हां कमलासुर त्याला आटोपेना. म्हणून 'गर्ग' मुनीच्या सांगण्यावरून बल्लाळानें एक मोठें हवन केलें. त्या प्रसंगीं यज्ञकुंडांतून एक मयूर बाहेर आला. बल्लाळानें त्याच्यावर आरोहण करून पुढें आपल्या त्रिशूळानें कमलासुराचा वध केला आणि त्याचे तीन तुकडे करून तीन दिशांना फेंकले.

---

१ 'चिंतामणिविजयांत' यासंबंधानें म्हटलें आहे—

**निर्गुण सगुण प्रणवाकृती । एक असे हा गणपती । रक्षावया भक्तांप्रती । अष्टस्थानीं प्रगटला ॥ १ ॥ मयूरक्षेत्रीं उद्धरिला कमलासुर । सिद्धटेकीं हरीनें तप केलें घोर । बल्लाळभक्ताचा केला उद्धार । मुरुडक्षेत्रीं प्रगटोनी ॥ २ ॥ महड क्षेत्रीं विनायक । प्रगटोनियां भक्तपालक । दुष्ट दानव वधोनि सकळिक । मुनी द्विजांसी रक्षिलें ॥ ३ ॥ विधीनें तप करितां स्थावर-भुवनीं । तेथें प्रगटला चिंतामणी । भ्रांती गेली निरसोनी । स्वसामर्थ्यासी लाधला ॥ ४ ॥ लेण्याद्रि दिव्य पर्वतीं । पार्वत्यात्मज झाला श्रीगणपती । दानव मर्दोनि पापमती । रक्षण केलें नगजेचें ॥ ५ ॥ ओझर क्षेत्रीं विघ्नहर । प्रगट झाला सर्वेश्वर । भक्तांचीं संकटें केलीं दूर । समूळ विघ्नें वारोनी ॥६॥ रांजण गांवीं श्रीगणपती । प्रगट झाली श्री ब्रह्ममूर्ती । आश्वासूनि सुरांप्रती । स्थापिलें स्वपदीं सर्वांतें ॥ ७ ॥**

त्यांपैकीं मस्तकाचा भाग ज्या ठिकाणीं पडला तेंच मोरगांव क्षेत्र होय. मयूरावर आरोहण केल्यामुळें बल्लाळाला मयूरेश्वर हें नांव प्राप्त झालें आणि तो या क्षेत्रांतच जाऊन राहिला.

दुसरी कथा अशी आहे कीं–'कश्यप' ऋषीला ( १ ) कद्रू व ( २ ) विनता अशा दोन बायका होत्या. कद्रूचे मुलगे ते काद्रवेय (सर्प) आणि विनतेचे मुलगे ते वैनतेय ( गरुड ). एकदां 'काद्रवेयां'नीं 'वैनतेयां'ना बंदींत टाकलें तेव्हां विनता शोक करूं लागली. कश्यप ऋषींनीं तिला आणखी एक मुलगा होईल म्हणून सांगितलें. पुढें तिला एक विशाल अंडें झालें.

पृष्ठ २८ वर सांगितलेला विनायकाचा अवतार गुणेश पराशराच्या घरीं होता. तो त्या वेळीं आठ वर्षांचा होता. त्यानें खेळतां खेळतां तें अंडें फोडलें. तेव्हां त्यांतून एक बलिष्ठ मोर निघाला आणि तो गुणेशाशीं लढूं लागला. कोणी कोणाला आटोपेना. शेवटीं गुणेशानें मोराला वर माग म्हणून सांगितलें, तेव्हां मोर म्हणाला, "तुझ्या नांवापूर्वीं माझें नांव येईल असें कर." गुणेशानें तें मान्य केलें आणि तेव्हांपासून त्याला मयूरेश्वर हें नांव प्राप्त झालें.

(२) **श्रीसिद्धिविनायक**—एकदां श्रीविष्णूच्या कानांतील मळापासून मधु-कैटभ या नांवांचे राक्षस उत्पन्न झाले. ते मोठे उन्मत्त होते. ते ब्रह्मदेवाकडे जाऊन सांगूं लागले, "चल, आमच्याबरोबर युद्ध कर." पण ब्रह्मदेव सात्विक वृत्तीचा देव. तो त्यांच्याशीं काय युद्ध करणार ! तो त्यांना म्हणाला—"बाबांनो, मला युद्धविद्या माहीत नाहीं, तुम्हांला युद्धाची खुमखुमीच असेल तर श्रीविष्णूकडेच चला." ब्रह्म-

देवानें अशा रीतीनें शरणागतीच पत्करल्यावर ते दोघे श्रीविष्णूकडे गेले व त्यांनीं त्याला युद्धाचें आव्हान दिलें.

श्रीविष्णूनें आव्हान स्वीकारलें आणि उभयतांचें तुंबळ युद्ध सुरू झालें. पण श्रीविष्णूलाही ते आटोपेनात. नंतर श्रीशंकराच्या सांगण्या-वरून श्रीविष्णूनें 'सिद्धि' क्षेत्रीं विनायकाचा षडक्षर मंत्रानें जप करून त्याला प्रसन्न करून घेतलें आणि पुनः मधु-कैटभांशीं गांठ पडल्यावर तो त्यांना म्हणाला, "दैत्यहो, तुम्ही पराक्रमी तर खरेच. तुमची ही युद्धविद्या पाहून मी सुद्धां प्रसन्न झालों आहें. तेव्हां तुम्हांला कांहीं वरदान मागावयाचें असेल तर मागून घ्या."

श्रीविष्णूचें हें बोलणें ऐकून त्या दैत्यांना हंसू आलें आणि ते त्याला म्हणाले—"तुझ्यासारख्याजवळ आम्ही मागणार काय? तूंच काय हवें असेल तें आमच्याकडे माग! आम्ही तुझी मनकामना पुरविण्याला समर्थ आहों."

त्यांचें हें भाषण ऐकून श्रीविष्णूनें त्यांना शब्दांत पकडण्याचें ठरविलें आणि तो त्यांना म्हणाला—"ठीक आहे; मागतों तर. तुमचे प्राण मला द्या, म्हणजे माझी इच्छा तृप्त होईल."

शब्दाला जागणें, प्राण गेला तरी शब्द न मोडणें ही पूर्वकालचीं महान् नीति होती. मधु-कैटभ दैत्य असले तरी ही नीति पाळीत. श्रीविष्णूनें आपल्याला शब्दांत पकडलें हें त्यांनीं ओळखलें. पण ते डगमगले नाहींत. ते म्हणाले—

"ठीक आहे. आम्हीं शब्द दिला तो दिला. फक्त जिथें जमीन नाहीं नि पाणीही नाहीं अशा ठिकाणीं आमचा वध कर, म्हणजे आमचे प्राण तुला मिळतील."

मग श्रीविष्णूनें त्यांना आपल्या मांडीवर घेतलें आणि त्यांना मारलें.

मधु-कैटभांना मारण्याची ही युक्ति किंवा सिद्धि श्रीगणेशाच्या आराधनेनेंच श्रीविष्णूला प्राप्त झाली, म्हणून त्यानें तिथें श्रीसिद्धि-विनायकाची स्थापना केली.

हें सिद्धटेक स्थान फार रम्य असून सध्यांचें देऊळ साध्वी अहिल्याबाईनें बांधलेलें आहे. नदीचा घाट पेशवाईतील प्रसिद्ध सेनापति हरिपंत फडके यांनीं बांधलेला आहे. हरिपंतांची शिबंदी व जरीपटक्याचें निशाण येथूनच मोहिमेवर निघत असे.

**( ३ ) श्रीबल्लाळेश्वर**—पूर्वी एका वनांत बल्लाळ नामक वैश्य-बालक आपल्या संवगड्यांसह शमीचे वृक्षाखालीं एक लहानसें मंदिर करून तिथें श्रीगणेशाची आराधना करी. ही गोष्ट संवगडी मुलांच्या पालकांस आवडेना. तेंव्हां त्यांनीं बल्लाळाचा बाप कल्याणशेटी याच्याकडे तक्रार केली. त्यानें बल्लाळाला या 'फंदा'पासून परावृत्त

---

१ श्रीगणेशपुराणांत या अवताराचें वर्णन करतांना "सिंधुदेशेऽतिविख्याता पल्लीनाम्नाऽभवत् पुरी । तस्यामासीद्धनी वैश्यः श्रेष्ठः कल्याणसंज्ञकः ॥" असें म्हटलें आहे. यांतील सिंधुदेश म्हणजे सध्यांचा सिंध प्रांत असें कित्येकांचें मत आहे, तर सिंधु म्हणजे समुद्र—त्याच्या नजीकचा देश अर्थात् कोंकण—म्हणून कुलाबा जिल्ह्यांतील पाली हाच तो गांव असें इतरांचें मत आहे. आज पालीचा बल्लाळेश्वरच अष्टविनायकांपैकीं एक असें मानतात.

कल्याण वैश्याचा उल्लेख दक्षिण कोंकणांतील वालावल गांवच्या 'आदिनारायण' देवाच्या बाबतींतही आलेला आहे. कल्याण नामक वैश्यानें ती मूर्ति द्वारकेंतून तिकडे नेली असें वर्णन आहे. हा कल्याण वैश्यच पालीच्या बल्लाळाचा बाप असेल तर कोंकणांतील पाली हेंच बल्लाळेश्वराचें स्थान या म्हणण्यास पुष्टि मिळते.

[stamp]

करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; शेवटीं वेदस मोकळेच पाहिले.' पण बल्लाळ गणेशध्यानांतून ढळला नाहीं. त्यामुळें गणेशाची त्याजवर कृपा होऊन त्यानें तिथेंच वास्तव्य केलें. त्या वेळेपासून बल्लाळेश्वर या नांवानेंच तो प्रसिद्ध झाला.

( ४ ) **श्रीवरदविनायक—वाचक्नवी** ऋषीची पत्नी **मुकुंदा** ही तरुण व सुंदर होती. तिचें **रुक्मांगद** नांवाच्या तरुण राजावर मन गेलें. पण तो राजा सद्वर्तनी व चारित्र्यवान असल्यामुळें तिला वश झाला नाहीं. तेव्हां कामविव्हलावस्थेंत तिनें रुक्मांगदाला 'तूं कुष्ठी होशील' असा शाप दिला. या संधीचा फायदा घेऊन इंद्रानें रुक्मांगदाचें रूप घेऊन ऋषीच्या अनुपस्थितींत मुकुंदेची इच्छा पुरी केली. त्यापासून तिला मुलगा झाला त्याचें नांव गृत्समद.

हा गृत्समद पुढें मोठा विद्वान झाला. पण जारज असल्यामुळें तत्कालीन याज्ञिक मंडळीकडून त्याचा अव्हेर होई. म्हणून त्यानें महढच्या वनांत घोर तपश्चर्या करून "गणानां त्वा०" मंत्राच्या अनुष्ठानानें गणपतीस प्रसन्न करून घेतलें आणि तो मंत्रद्रष्टा झाला. पुढें मुकुंदेकडून त्याला आपली जन्मकथा कळली, तेव्हां त्यानें तिला शाप दिला कीं, 'जिला पुष्कळ फळें येतात पण जी प्राण्यांनीं विवर्जित असते अशी 'कंटकी' तूं होशील.' त्यामुळें ती 'बोर' झाली.

गृत्समदानें ज्या वनांत तपश्चर्या केली होती, तें पुढें 'पुष्पक' किंवा 'भद्रक' या नांवानें प्रसिद्ध झालें आणि गृत्समदावर अनुग्रह केलेला गणपति **'वरदविनायक'** या नांवानें प्रसिद्ध झाला.

पूर्वकालीन 'भद्रक' तेंच सध्यांचें 'महढ' अथवा 'मढ' असून तिथें भाद्रपद व माघ या दोन्ही महिन्यांत शुक्ल १ ते ५ पर्यंत मोठा उत्सव होतो.

(५) **श्रीचिंतामणि**—पूर्वीं द्रविड देशांत अभिजित् नांवाचा पराक्रमी व धर्मशील राजा होता. त्याच्या बायकोचें नांव गुणवती. त्यांना पुष्कळ वर्षें अपत्य झालें नाहीं. म्हणून त्यांनीं वैशंपायन ऋषीच्या सांगण्यावरून सिंधुतीरावरील एका सरोवराच्या कांठीं जाऊन चातुर्मास तपश्चर्या केली. त्या सरोवरांत पूर्वीं ब्रह्मवीर्य पडलेलें होतें. गुणवतीनें एकदां त्या सरोवराचें पाणी प्राशन केलें असतां त्यांतून तें वीर्य गुणवतीच्या पोटांत शिरलें आणि पुढें यथाकाल गुणवती गर्भवती होऊन तिला मुलगा झाला त्याचें नांव 'गण'.

हा 'गण' मोठा पराक्रमी निघाला. पण तो स्वभावानें तामसी होता, त्यामुळें त्याला 'गणदैत्य' म्हणत. एकदां तो कपिलमुनीच्या आश्रमांत गेला असतां कपिलमुनीनें आपल्या जवळच्या '[1]चिंतामणि' मण्याच्या सामर्थ्यानें गणदैत्याला नि त्याच्या सैन्याला थोडक्या अवधींत आकंठ भोजन घातलें.

भोजनोत्तर गणदैत्यानें ऋषीजवळ त्या चिंतामणीची मागणी केली. कपिलमुनि म्हणाले, "प्राणभूतं मणिं नाहं दास्येऽन्यत् वक्तुमर्हसि" म्हणजे हा मणि माझा प्राणच आहे. तो मी कसा देऊं? दुसरें कांहीं माग. पण गणदैत्य हट्टालाच पेटला आणि त्यानें तो मणि त्या ऋषीच्या हातून हिसकून घेतला!

कपिलमुनीचें सर्वस्वच गेल्यामुळें त्याला अतिशय दुःख झालें. त्यानें महामायेची प्रार्थना केली. महामायेनें प्रगट होऊन त्याला विनायकाची आराधना करण्यास सांगितलें. ही आराधना म्हणजे

---

१ हा मणि त्याला इंद्राकडून प्राप्त झाला होता.

'ॐकारपल्लवित नमोन्त अष्टादश लक्ष जप, तद्दशांश हवन, तद्दशांश तर्पण आणि द्विजभोजन' होय. या आराधनेनें विनायक संतुष्ट होऊन त्यानें त्याला मणि आणून देण्याचें वचन दिलें.

इकडे गणदैत्य आपल्या राजधानींत असतां त्याला एकदां स्वप्न पडलें कीं, कपिलमुनीच्या सांगण्यावरून आपण, आपली सेना आणि आपलें सगळेंच राज्य विनायकानें वेढलेलें असून त्याच्या परशूनें आपलें मस्तक तुटून पडलें आहे. हें स्वप्न खरें होऊं नये म्हणून कपिल मुनीलाच नाहींसा करण्यासाठीं गणदैत्य पुनः कपिलाश्रमांत गेला, तों तिथें तो मुनि "चतुर्बाहुं भीमकायं यथा स्वप्ने विलोकितं। सिंहयानं च दधतं परशुं कमलं शुभं ॥ अदन्तं मोदकान् पुष्प-मालया चारु शोभितम्" अशा विनायकाची पूजा करीत असलेला आढळला.

गणानें कपिलाला विचारलें, "तूं इथें ही कशाची स्थापना केली आहेस? बोल. नाहींतर एकाच बाणानें ह्याचा तुझ्यासह निकाल करून टाकतों!" कपिल म्हणाला, "तुझ्या हातून आतांपर्यंत जीं पातकें झालीं आहेत त्यांचें प्रायश्चित्त देण्यासाठीं हा साक्षात् ईश्वर इथें प्राप्त झाला आहे!"

पुढें विनायकाचें आणि गणदैत्याचें युद्ध होऊन विनायकाच्या परशूनें गणदैत्य मारला गेला. गणदैत्याचा बाप अभिजित् यानें नंतर विनायकाची प्रार्थना करून चिंतामणि त्याचेकडे दिला. विनायकानें तो कपिलाच्या स्वाधीन केला. पण कपिलानें आतां तो विनायकालाच परत देऊन, "गणं हत्वा महावीर्यं हृतश्चिंतामणिस्त्वया। चिंतामणिरिति ख्यातं तव नाम भविष्यति ॥" असें त्याला सांगितलें. विनायकानें त्याचा स्वीकार करून 'चिंतामणि' हें नांव धारण केलें आणि तो तेथेंच वास्तव्य करून राहिला.

दुसऱ्या एका कथेप्रमाणें इंद्रानें अहिल्येशीं केलेल्या व्यभिचारा-बद्दलचा दोष व शाप यांच्या निवृत्तीसाठीं तप करून विनायकाला प्रसन्न करून घेतलें, त्या वेळीं विनायकाचा जो अवतार झाला तो चिंतामणिरूपानें झाला आणि त्याच्या कृपाप्रसादानें इंद्रानें आरोग्य व इंद्रपद पुनः मिळविलें. या गोष्टीचें स्मारक म्हणून आपल्या तपोभूमींत इंद्रानें श्रीचिंतामणीची स्थापना केली, तेंच थेऊर होय. हें पुण्याच्या पूर्वेस तेरा मैलांवर आहे.[1]

**( ६ ) श्रीगिरिजात्मक**—सिंधु नामक दैत्याला मारण्यासाठीं पार्वतीच्या पोटीं गणेशाचा अवतार झाल्याची कथा पृष्ठ ९ वर दिली आहे. त्या अवताराच्या पूर्वीं पार्वतीनें एका गुहेंत गजाननाची पार्थिव मूर्ति स्थापून तपश्चर्या केली होती. तिच्या आराधनेनें एका भाद्रपद शुक्ल ४ ला तीच मूर्ति पुत्ररूपानें सचेतन झाली आणि तिला 'गिरिजात्मक' हें नांव प्राप्त झालें.

पार्वतीची तपश्चर्येची ही गुहा जुन्नरनजीकच्या डोंगराच्या पलीकडे आहे. त्या गुहेच्या मागील बाजूला एक मूर्ति कोणा सत्पुरुषानें खोदविली आहे, त्याचीच 'गिरिजात्मक' म्हणून हल्लीं अर्चा होते.

येथें बौद्धांचें एक सुंदर लेणें आहे, म्हणून या डोंगरास 'लेण्याद्रि' असें म्हणतात. श्रीगणेशपुराणांत या स्थानांचीं नांवें 'जीर्णापुर' व 'लेखन' पर्वत अशीं दिलीं आहेत.

---

१ श्रीमंत माधवराव पेशवे यांची या स्थानावर फार भक्ति होती. अखेरच्या दुखण्यांत ते येथेंच येऊन राहिले होते आणि त्यांचा अंतही येथेंच झाला. त्यांची पत्नी रमाबाई याच ठिकाणीं सती गेली. तिचें वृंदावन नदीकांठीं आहे. येथील नदीचे डोहास कदंब तीर्थ म्हणतात.

याच तीर्थमाहात्म्यानें रुक्मांगद राजा आईबाप व परिवार यांसह स्वर्गास गेला अशी कथा आहे.

(७) **श्रीविघ्नेश्वर**—पूर्वीं हिमालय व विंध्याद्रि यांच्यामध्यें हैमवती नांवाची नगरी होती. तेथें अभिनंदन नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें इंद्रपद प्राप्त व्हावें म्हणून एक मोठा यज्ञ आरंभिला. इंद्राला भीति वाटून त्यानें त्या यज्ञांत विघ्न उत्पन्न करण्यासाठीं 'कालपुरुषा'ला पाठवून दिलें.

कालपुरुषानें मोठें उग्ररूप घेऊन अभिनंदनाच्या यज्ञाचा विध्वंस केला, इतकेंच नव्हे तर साऱ्या पृथ्वीवरील श्रौतस्मार्तादि कर्में बंद पाडलीं. त्याला सारे लोक **विघ्नासुर** असेंच म्हणत असत.

सिंदुरासुराला मारण्यासाठीं पार्वतीच्या पोटीं अवतार घेऊन गजानन गुणेश या नांवानें पराशर ऋषीच्या[1] आश्रमीं होता हें पृ. २८ वर सांगितलें आहे. विघ्नासुराच्या उपद्रवानें दु:खीकष्टी झालेल्या मुनींनीं पराशराच्या घरीं जाऊन गुणेशाला सगळी हकीकत सांगितली. गुणेश म्हणाला, "ही सगळी इंद्राची करणी आहे. त्यानेंच कालपुरुषाला विघ्नासुररूपानें भूमीवर पाठविलें आहे. पण मी आतां तुमच्याबरोबर येऊन त्याचा बंदोबस्त करतों."

याप्रमाणें बोलून गजानन विघ्नासुराशीं गांठ घालण्यासाठीं त्याचा शोध करीत निघाला. कमल, परशु, पाश व अंकुश अशीं आयुधें त्यानें आपल्याबरोबर घेतलीं होतीं. उभयतांची गांठ पडतांच गजाननानें आपला अंकुश विघ्नासुरावर फेंकला, तोंच विघ्नासुरानें पक्षिरूप घेऊन आकाशांत उड्डाण केलें. गजाननानें त्या पक्ष्यावर कमल फेंकलें, तें पाहून विघ्नासुरानें अग्नीचें रूप घेतलें. त्यावर गजाननानें

१ कित्येक ठिकाणीं यालाच पार्श्व असें म्हटलें आहे.

मेघास्त्र सोडलें, तेव्हां विघ्नासुरानें वायुरूप घेतलें. त्यावर तोड म्हणून गजाननानें पर्वतास्त्र सोडलें, पण विघ्नासुरानेंही वज्रास्त्र सोडून पर्वताचा चक्काचूर केला. तेव्हां गजाननानें एक महाभयंकर शक्ति निर्माण केली. तिच्यापुढें मात्र विघ्नासुराची कांहींच मात्रा चालेना. तेव्हां तो शरण आला. त्याचें पूर्वींचें कालपुरुषरूपही त्याला प्राप्त झालें. गजाननानें अर्थातच 'शरणागतभयशमना'चें आपलें ब्रीद पाळून त्याला सांगितलें कीं, ज्या ठिकाणीं माझें स्मरण-पूजन-कीर्तन चाललें असेल तिथें तूं जातां कामा नये. 'मन्नामस्मरणं यत्र पूजनं वाऽपि भक्तितः । स्तुतिर्वा प्रणतिर्यत्र तत्र स्थेयं न कर्हिचित् ॥'

विघ्नासुर म्हणाला, "ठीक. पण माझेंही एक मागणें आहे तें आपण पुरें करावें. तुमच्या नांवाच्या मागें माझें नांव जोडून द्या." गजाननानें तें मान्य केलें. तेव्हांपासून **विघ्नराज** किंवा **विघ्नेश्वर** हें नांव त्याला प्राप्त झालें.

( ८ ) **श्रीगणपति**—पृष्ठ १७ वर ज्या गृत्समद ऋषीची माहिती दिली आहे त्या ऋषीला एकदां मोठी शिंक आली आणि त्याच्या नाकपुडींतून एकदम एक अवाढव्य आकाराचा पुरुष उत्पन्न झाला. तो महापराक्रमी निघाला. लौकरच त्यानें सर्व देवदानवांना जिंकून अंतरिक्षांत सोनें, रुपें नि लोखंड या तीन धातूंचीं तीन नगरें वसविलीं. लोक त्याला त्रिपुरासुर म्हणूं लागले. देव भयभीत होऊन पळाले आणि शंकराकडे गेले. शंकरानें त्रिपुराला मारण्याचें त्यांना वचन दिलें आणि तत्सिद्ध्यर्थ विनायकाची आराधना केली. त्या वेळीं शंकरानें ज्या विनायकरूपी गजाननमूर्तीचें ध्यान केलें त्या मूर्तीला दहा सोंडा व वीस हात होते. विनायक प्रसन्न होऊन सत्त्व-रज-तमात्मक गुणेश-

रूपानें प्रगट झाला. शंकरानें त्याला तपाचें कारण सांगितल्या-वर त्यानें आपलें आद्यबीज शंकराला अर्पण केलें आणि त्या बीजानें त्रिशूळ अभिमंत्रित करून त्रिपुरावर सोडण्याची सूचना देऊन ठेविली.

याच वेळीं शंकरानेंही त्याला वर दिला तो असा—

**"आरंभेषु च सर्वेषु श्रौते स्मार्ते च कर्मणि।**
**नित्यनैमित्तिके काम्ये औच्चाटे चाभिचारिके ॥ १ ॥**
**मोहके वश्यके चैव लौकिके चापि कर्मणि ।**
**ब्रह्मविष्ण्वादिभिर्देवैर्मुनिमानुषराक्षसैः ॥ २ ॥**
**गणेशैश्चापि शैवैश्च सौरैः शाक्तैश्च वैष्णवैः ।**
**असुरैर्यक्षगंधर्वैः फणिभिः पशुयोनिजैः ॥ ३ ॥**
**पूजनीयः प्रयत्नेन संपूर्णफलकांक्षिभिः ।**
**पूजयिष्यन्ति ये न त्वां तेषां सर्वं वृथा भवेत्" ॥ ४ ॥**

पुढें त्रिपुराचें नि शंकराचें युद्ध होऊन शंकरानें त्रिपुराला ठार मारलें. त्या वेळेपासून 'त्रिपुरारि' हें नांव शंकराला प्राप्त झालें.

शंकरानें ज्या ठिकाणीं तप केलें त्या ठिकाणींच पुढें या गणप-तीची स्थापना झाली. हें ठिकाण म्हणजेच सध्यांचा रांजणगांव होय.

या स्थानासंबंधानें दुसरी एक कथा अशी आहे कीं, रति-मदनांनीं शंकराच्या कोपापासून मुक्त होण्याकरतां गणपतीच्या षडक्षरी मंत्राचें अनुष्ठान शंकराच्या सांगण्यावरूनच केलें. तेव्हां त्यांना दशभुजात्मक गणपतीचें दर्शन झालें, त्याचें नांव महोत्कट असें ठेविलें. पुढें मद-नानें प्रद्युम्न रूपांत अवतरून त्याची या तपोवनांत स्थापना केली.[1]

या ठिकाणीं जी दृश्यमूर्ति आहे तिच्याखालीं तळघरांत एक लहान मूर्ति आहे. तिला १० सोंडा व वीस हात आहेत. ती कधीं काळीं बाहेर काढतात.

---

१ या स्थानास गणेशपुराणांत मणिपूर म्हटलें आहे.

४

# आणखी कांहीं कथा

मागील प्रकरणांत सांगितलेल्या अष्टविनायकांप्रमाणेंच श्रीगजाननाच्या आणखी ब्र्याच अवतारांच्या कथा व त्यांचीं स्थानें पुराणान्तरीं वर्णिलीं आहेत. त्यांतील पुढील कथा विशेष प्रसिद्ध आहेत—

## १ श्रीगजानन आणि सिंदुरासुर

एकदां ब्रह्मदेव सत्यलोकीं सुखासीन असतां त्याला जांभई आली आणि तेवढ्यांत त्याच्या तोंडांतून एक काळ्या केंसांचा, तांवड्या अंगाचा नि क्रूर चेहऱ्याचा महापुरुष बाहेर पडला. ब्रह्मदेवानें त्याच्या रंगावरून त्याचें नांव **सिन्दूर** असें ठेविलें. जांभईतून बाहेर पडला म्हणून त्याला **जृम्भाज** असेंही म्हणत.

ब्रह्मदेवानें त्याला असाही वर दिला होता कीं, 'तूं त्रैलोक्यांत विजयी होशील. इन्द्रादि देव—इतकेंच नव्हे तर खुद्द विष्णूकडूनही तुला भय नाहीं. ज्याला तूं आपल्या बाहूंनीं आलिंगन देशील त्याचें भस्म होईल.'

सिन्दुराला परम हर्ष झाला हें सांगणें नकोच. पुढें या वराचा खरेखोटेपणा पहावा म्हणून ब्रह्मदेवालाच प्रथम आलिंगन देण्याचें सिन्दुरानें ठरविलें व तो त्याच्या अंगावर धांवून गेला! तेव्हां ब्रह्मदेव गडबडून पळत पळत श्रीविष्णूकडे गेला. श्रीविष्णूनें सिंदुराला सांगितलें, "अरे बाबा, या गरिबाच्या मागें कां लागतोस? कैलास

पर्वतावर शंकर आहे, तो 'चराचराचा संहर्ता' आहे, त्याच्याकडे जाऊन आपला काय तो पराक्रम दाखव."

सिंदुराला तें खरें वाटलें आणि तो लगेच उड्डाण करून कैलासाला गेला. तिथें शंकर ध्यानस्थ होते. पण पार्वती बाहेर होती, ती त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां प्रथम हिलाच पळवून न्यावी असा विचार करून तो तिला ओढूं लागला. पार्वती मोठ्यानें आक्रोश करूं लागली. शंकर जागे झाले. त्यांनीं एका हातांत त्रिशूल नि दुसऱ्या हातांत डमरू घेऊन सिंदुरासुरावर हल्ला केला, तों सिंदूरही शंकराला आलिंगन देण्यासाठीं पुढें झाला. इतक्यांत तिथें अकस्मात् एक ब्राह्मण उत्पन्न होऊन त्यानें एक परशु दोघांनाही नकळत दोघांच्या मध्यें टाकला, तो सिंदुरासुराच्या छातीवर पडला. त्यामुळें सिंदुराचें काळीज खचलें! तेव्हां ब्राह्मण त्याला म्हणाला, "अरे, आतां इथें अधिक काल राहशील तर हा शंकर त्रिशूलानें तुझा प्राण घेईल. तर जीव घेऊन पळ कसा!" तेव्हां सिंदूर पार्वतीला सोडून देऊन तिथून निघून पसार झाला!

पुढें हा ब्राह्मण कोण याची पार्वतीनें चौकशी केली, तेव्हां ब्राह्मणानें आपलें खरें स्वरूप दाखविलें. तो पार्वतीपुत्र **विनायकच** होता. असो.

इकडे सिंदूर पुनः पृथ्वीतलावर आला तो सगळ्यांनाच उपद्रव देत सुटला. अनेक राजांना त्यानें भस्मसात् केलें. ब्राह्मणांच्या तर तो हात धुवून मागें लागला.

**ब्राह्मणा निहताः केचित् द्विजाः केचिच्च ताडिताः।**
**श्रोत्रिया निहताः केचित् केषांचित् योषितो हृताः ॥ १ ॥**
**केषांचित् निहताः पुत्राः केषांचित् ज्वालिता गृहाः।**
**अग्निहोत्राणि सर्वाणि यज्ञपात्राण्यनेकशः ॥ २ ॥**
**यज्ञवृक्षा ऋषिगृहास्तडागानि सरांसि च।**
**भग्नानि तेन दैत्येन देशे देशे पुरे पुरे ॥ ३ ॥**

अशा रीतीनें साऱ्या पृथ्वीवर त्यानें प्रलय मांडला. यज्ञयाग बंद पडल्यामुळें इंद्रादि देवांना हविर्भाग मिळेनासा झाला. त्यामुळें तेही दुःखित झाले. शेवटीं सर्वांनीं विनायकाची प्रार्थना केली आणि त्यानें त्यांना पार्वतीच्याच पोटीं आणखी अवतार घेण्याचें वचन दिलें.

इकडे सिंदुरासुर उन्मत्त होऊन सर्वांना पीडा देतच होता. एकदां तो स्वतःशींच स्वगुणांचें वर्णन करीत असतां म्हणाला—

**ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च तृणवत् गणिता मया ।**
**अहं धन्यतमो लोके त्रिलोकी विजिता मया ॥ १ ॥**
**न देवानां मनुष्याणां न च पातालवासिनाम् ।**
**नेतरेषां च जन्तूनां भयं मेऽस्ति कदाचन ॥ २ ॥**

इतक्यांत आकाशवाणी झाली कीं—"मूर्खा, तुझी घमेंड व्यर्थ आहे. तुझा नाश करण्यासाठीं गिरिजेच्या पोटीं गर्भ राहिला आहे."

ही आकाशवाणी ऐकून सिंदूर तावडतोब कैलासाला गेला. पण तिथें पार्वती त्याला आढळली नाहीं. तेव्हां तो तिच्या शोधार्थ वनें धुंडाळूं लागला. शेवटीं 'पर्यली' वनांत ती त्याला सांपडली. त्यानें वायुरूप घेऊन तिच्या उदरांत प्रवेश केला आणि ती झोंपली असतां तिच्या उदरस्थ गर्भाचें मस्तक आपल्या नखांनीं छेदून तें त्यानें विंध्याचलानजीक नर्मदेच्या पात्रांत नेऊन टाकलें. यामुळेंच नर्मदेच्या पात्रांतील सारे दगड गणेशरूप झाले आहेत. असो.

पुढें पार्वती यथाकाल प्रसूत झाली. पण बालक बाहेर पडलें तें निःशिर! ती शोक करूं लागली. शंकरांनीं तें पाहिलें आणि हातांत घेतलें. त्यांनाही वाईट वाटलें. त्यांचा प्रिय गण नन्दिकेश्वर जवळ होता. तो म्हणाला, "हें दुश्चिन्ह आहे." तो लगेच तिथून निघून अमरावतीला इंद्राकडे गेला, आणि तिथल्या देवांना त्यानें ही सर्व हकीकत सांगि-

तली. इंद्र आणि इतर सारे देव आपापल्या वाहनांवर बसून निघाले आणि कैलासाला आले.

ब्रह्मदेवानें त्या बालकाला उचलून देवसभेंत आणून ठेविलें. जो तो आश्चर्य करूं लागला. इतक्यांत त्या बालकाच्या कंठांतून वाणी निघाली कीं, "सिंदूर दैत्यानें वायुरूप घेऊन आठव्या महिन्यांतच माझें शिर कापून नेलें. पण मी त्याचा संहार करण्यासाठींच अवतार घेतला आहे." तेव्हां नारद म्हणाले, "आपल्या शिराच्या ठिकाणीं काय योजना करावी? आम्हांला कांहीं समजत नाहीं; तेव्हां आपणच काय ती योजना करा!"

नारदानें असें म्हणतांच त्या बालकाच्या मस्तकाच्या ठिकाणीं गजमस्तक दिसूं लागलें आणि सर्व देवांनीं त्याचें 'गजानन' असें नांव ठेविलें. शंकरांनीं आपल्या मस्तकावरचा चंद्र त्याला दिला. त्यामुळें त्याचें **भालचंद्र** हें नांव पडलें. ब्रह्मदेवानें कौतुकानें त्याला **विकट** असें नांव दिलें.

ही गोष्ट भाद्रपद शुद्ध ४ च्या दिवशीं घडली.

पुढें गजाननानें शंकराला सांगितलें कीं, सिंदुरासुराच्या वधाखेरीज मला आणखीही कांहीं कार्यें करावयाचीं आहेत. त्यांत लोकांच्या अज्ञानाचा नाश करून त्यांची वैदिक धर्माकडे प्रवृत्ति करावयाची हेंही एक कार्य आहे. त्यासाठीं मी वरेण्य राजाला उपदेश करणार आहें. तो माझा मोठा भक्त आहे. त्याच्या पत्नीनें माझी बारा वर्षें भक्ति केली आहे. म्हणून मीं तिला तिच्या घरीं बालभावानें राहाण्याचें वचन दिलें आहे. तिच्या बालकाचें राक्षसांनीं नुकतेंच हरण केलें आहे. जागी झाल्यावर ती शोक करूं लागेल; तेव्हां मला ताबडतोब तिच्यापाशीं नेऊन ठेवा.

त्याप्रमाणें शंकरांनीं नंदीबरोबर या बालकाची वरेण्याच्या माहिष्मती नामक नगरींत रवानगी केली. नंदीनें राजगृहांत प्रवेश करून या बालकाला वरेण्याची राणी पुष्पिका हिच्या मंचकावर नेऊन ठेविलें.

पुष्पिका जागी होऊन पहाते तों आपल्या शेजारीं चार हात व सोंड असलेलें एक कुरूप बालक! हां हां म्हणतां ही बातमी राजवाड्यांत सर्वत्र पसरली. राजमंत्र्यांनीं वरेण्याला सल्ला दिला कीं, हें बालक घरांत ठेवूं नये! तेव्हां राजानें त्याला नजीकच्या एका अरण्यांत नेऊन सोडलें.

त्या अरण्यांत पराशर ऋषीचा आश्रम होता. ऋषीला फिरतां फिरतां तें बालक दिसलें. त्याला स्वतःला संतति नव्हती. तेव्हां हें बाळ आपल्याला ईश्वरानेंच दिलें आहे असें म्हणून त्याला घरीं आणून त्यानें त्याचें पालन केलें.

हें बाळ त्या ऋषीच्या आश्रमांत लहानाचें मोठें झालें. ऋषीनें त्याला सर्व प्रकारच्या विद्या शिकविल्या. पण हा बालक जात्याच तीव्र बुद्धीचा व ज्ञानी असल्यामुळें पराशर ऋषि केवळ निमित्तमात्र त्याचा गुरु होता. कोणतीही विद्या ऋषीनें एकदां सांगावयाचा अवकाश कीं गजानन तत्काळ ती ग्रहण करीत असे. ऋषीलाही त्याचें दैवी स्वरूप आतां कळून चुकलें होतें व त्याच्या अंगच्या अनेक गुणांमुळें त्याला आतां **गुणेश** असें नांव त्यानें ठेविलें होतें.

पुढें हा गुणेश मोठा झाल्यावर सिंदुरासुराच्या नगरीवर चाल करून गेला आणि उभयतांचें युद्ध जुंपलें. तेव्हां गुणेशानें आपलें अंग सिंदुरासुराच्या अंगाला घांसून घांसूनच त्याचा चेंदामेंदा केला! पण या संघर्षांत गुणेशाचें स्वतःचें अंगही तांबडें झालें. तेव्हांपासून त्याला **सिंदूरवदन**, **सिंदूरप्रिय** अशीं नांवें पडलीं.

नंतर या श्रीगजानन–गुणेशानें वरेण्य राजाला **गणेशगीता** सांगून ज्ञानप्राप्ति करून दिली.

## २ श्रीगजानन आणि गजासुर

पूर्वीं महेश या नांवाचा एक राजा होता. तो भुवनत्रयांत विख्यात होता. देवगुरु बृहस्पति एकदां त्याच्या घरीं आले असतां त्यानें त्यांची पूजा करून प्रसन्न करून घेतलें आणि देवगुरूंनीं त्याला आशीर्वाद दिला कीं, "तुला सर्व देवही वंदन करतील." महेशानें विचारलें, "हें केव्हां घडून येईल ?" बृहस्पति म्हणाले–"तुला पुढल्या जन्मीं गज-योनि प्राप्त होईल तेव्हां."

कालान्तरानें महेश पंचत्व पावला आणि 'पर्यली' काननांत एका गजकुलांत जन्म घेता झाला. त्याचें नांव गजासुर.

मागील कथेंत (पृ. २६ पहा) सांगितल्याप्रमाणें शिवपार्वती 'पर्यली' काननांत असतांना त्यांनीं तिथें एक सुशोभित मंडप उभारला होता. तो या गजासुरानें मोडला. तेव्हां शंकरानें आपला त्रिशूळ त्याच्या मस्तकावर मारून त्याला गतप्राण केलें. मरतांना गजासुरानें "शिवाय नमः" असें म्हटलें. तेव्हां शंकराला हा आपलाच भक्त आपण वधिला याबद्दल फार दुःख झालें, आणि त्याच्याच विनंतीवरून त्याचें मस्तक पार्वतीच्या निःशिर बालकाच्या कंठावर बसवून शंकरानें त्याचें चर्म स्वतः परिधान करण्यासाठीं घेतलें. बालकाला 'गजानन' नि शंकराला 'कृत्तिवासा' अशीं नांवें प्राप्त झालीं तीं यामुळेंच.

वर सांगितलेलें 'पर्यली' कानन तेंच सध्यांचें 'परळी वैजनाथ' (नगर जिल्हा) होय. या स्थानाचें महत्त्व स्वतः श्रीशंकरांनींच पुढीलप्रमाणें वर्णन केल्याचें 'विनायकमाहात्म्यां'त सांगितलें आहे—

तदैव भूतलं यातः सगणो गहनं वनम् ।
बभ्राम न ददर्शाहं यदा रम्यं तु काननम् ॥
तदैव वीक्षितं ( स्कन्द ! ) पर्यलीकाननं मया ।
अनेकवृक्षसंपन्नं शुकसारिकशोभितम् ॥
सिंहशार्दूलसंघैश्च नानाविधमृगैर्युतम् ।
वापीकूपतडागैश्च कासारैर्निर्झरैरपि ॥
जातीचम्पकमालाभिः कमलैश्च सुशोभितम् ।
पुष्पवृक्षैरनेकैश्च नानापक्षिगणैस्तथा ॥
कदलीनिःसरच्चन्द्रसुशीतलशिलातलम् ।
रसालश्रीफलैर्युक्तं जम्बूजम्बीरशोभितम् ॥
सौवीरपनसैर्जुष्टमिङ्गुद्यसनराजितम् ।
उन्मत्तपिचुमन्दारकपित्थचिंचिणीयुतम् ।
चन्दनागरुताम्बूलीनारिकेलीवृतं क्वचित् ॥

'परळीमाहात्म्याच्या' पोथींत म्हटलें आहे कीं, श्रीगणपतीचे महोत्कट ( कश्यपपुत्र ), गुणेश व गणेश ( शिवपुत्र ) हे अवतार परळी येथेंच झाले. आज या गांवीं त्यांचीं तीन देवळें आहेत.

## ३ धूमकेतु अथवा धूम्रवर्ण

पूर्वी **विंध्य** देशांत **पार्वती** नांवाची नगरी होती. तिथें **धूम** नांवाचा एक दैत्य राज्य करीत होता. तो मोठा शिवभक्त होता. संतति व संपत्ति त्याच्या घरीं केवळ पाणी भरीत होत्या.

एकदां **भृगु** ऋषि त्याच्या दरबारीं आले असतां धूमानें त्यांना विचारलें, "भृगो, मला आज हें जें वैभव प्राप्त झालें आहे तें कशामुळें?"

भृगु ऋषि म्हणाले—"हें तुझ्या पूर्वसुकृताचें फल आहे. पूर्वजन्मीं तूं **विकृति** नांवाचा राजा होतास. इंद्रपदप्राप्तीसाठीं तूं १०० यज्ञांचा

[stamp]

संकल्प करून ९९ यज्ञ पुरे केलेस. शंभराव्या यज्ञाच्या वेळीं इंद्राला भीति उत्पन्न होऊन त्यानें नारदाला विघ्न उत्पन्न करण्याकरितां भूलोकीं पाठवून दिलें. नारदानें एका वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन तुझ्या वाड्यांत प्रवेश केला. तूं त्याचा यथोचित सत्कार करून त्याला विचारलेंस, 'आपण कोण? कुठून आलां?'

"नारदानें सांगितलें, 'माझें नांव **शिवशर्मा.** एवढा म्हातारा झालों तरी अद्यापि माझें लग्न कांहीं झालेलें नाहीं. तूं दानशूर आहेस असें ऐकून इथें आलों. तेव्हां मला बायको पाहिजे आहे. तुझी ही पत्नी रूपगुणान्वित आहे, तेवढी ती मला दे!'

"तूं म्हणालास, 'मुने, माझी ही प्रियपत्नी मी तुला औपचारिक रीत्या देतों व मग भारंभार सोनें देऊन ती परत घेतों म्हणजे झालें कीं नाहीं?' पण ब्राह्मण कांहीं ऐकेना. तूं पुष्कळ युक्तिवाद करून पाहिलास. पण तो ब्राह्मण यज्ञनाशाचा संकल्पच करून आलेला! तो थोडाच तुझें ऐकतो! त्यानें उलट तुलाच 'तुझा धर्म सात्विक नव्हे, आसुरी आहे.' असें म्हणून रागानें तिथलें यज्ञकुंड व यज्ञपात्रें फोडून टाकलीं आणि रागारागानें तिथून निघून गेला!

"अशा रीतीनें शंभरावा यज्ञ तडीस न गेल्यानें तुला इंद्रपद प्राप्त झालें नाहीं. पण नव्याण्णव यज्ञाचें फळ म्हणून तुला या जन्मीं हें वैभव प्राप्त झालें आहे. जन्म असुर योनींत झाला एवढेंच यांत वैगुण्य आहे." एवढें सांगून **भृगु** निघून गेला. असो.

त्याच नगरींत **माधव** या नांवाचा एक क्षत्रिय राहत असे. त्याच्या घरीं धनधान्याची समृद्धि होती. पण पुत्रसंतति नसल्यामुळें तो सदा

कष्टी असे. त्याच्या बायकोचें नांव **सुमदा** असें असून ती रूप-लावण्ययुक्त असली तरी वंध्यत्वामुळें कष्टी असे.

एकदां माधव रागानें तिला म्हणाला, "वंध्येचा जन्म फुकट आहे. मुलगा नाहीं तर तुझें हें रूप घेऊन काय जाळायचें आहे? आज-पासून मला तोंड दाखवूं नकोस!"

सुमदेला वाईट वाटलें आणि ती तशीच निघून नगराबाहेर पडली. फिरतां फिरतां एका रानांत जाऊन एका झाडाखालीं राहिली आणि तिथें तिनें श्रीविष्णूचें ध्यान आरंभिलें. ना स्नान, ना आहार, ना निद्रा. एखाद्या अचल दगडाप्रमाणें तिनें तिथें बारा वर्षें काढलीं. तिच्यावर वारूळ वाढलें. शेवटीं श्रीविष्णु प्रसन्न झाले आणि प्रत्यक्षच तिच्या-समोर येऊन उभे राहिले.

**"शंखं चक्रं गदां पद्मं मुकुटं कुंडले दधत् ।**
**वल्मीकलुप्तगात्रां तां पश्यति स्म रमापतिः ॥ १ ॥"**

**सुमदा** तें रूप पाहून चकित झाली आणि वारुळांत निःशक्त झालेलीं तिचीं गात्रें पुनः सतेज झालीं. तिला दिव्य देह प्राप्त झाला. श्रीविष्णूनें 'वर माग' म्हणतांच ती म्हणाली, "तुझ्यासारखा पुत्र होईल तरच मी हें तोंड पतीला दाखवीन. नाहींतर इथेंच प्राण सोडीन!"

श्रीविष्णु म्हणाले, "मीच तुझा पुत्र होतों."

असें म्हणून त्यांनीं तिच्या मस्तकावर हात ठेविला आणि ते अदृश्य झाले.

**सुमदा** डोळे उघडून पहाते तों समोर कोणीच नाहीं. तेव्हां ती भयविव्हल होऊन इकडे तिकडे फिरूं लागली. तिच्या देहाची कांति आतां वेगळीच झालेली असल्यामुळें ती जाईल तिकडे तेजाचे लोळ

फांकत असत. पुढें कांहीं दिवसांनीं ती खनगराच्या वेशीवर आली. लोकांनीं तिचा तो दिव्य देह पाहून ती बातमी राजाला सांगितली. राजानें सुंदर वाहन पाठवून तिला नगरांत आणिलें व सत्कार केला. पुढें माधव व सुमदा आपल्या घरीं आनंदानें राहूं लागलीं. सुमदेनें आपल्या तपश्चर्येची हकीकत सांगून श्रीविष्णूनें आपल्या पोटीं जन्म घेण्याचा वर दिल्याचेंही माधवाला कळविलें.

इकडे **धूम** राजा त्या वर्षीं शरदृऋतूमध्यें आपल्या सेनेसह दिग्विजयार्थ बाहेर पडला असतां आकाशवाणी झाली कीं, "सुमदेला पुत्र होईल तो राजाचा घात करणारा होईल."

ही आकाशवाणी ऐकून राजाला परम खेद झाला. तो तसाच मागें फिरला. आपल्या वाड्यांत त्यानें एक मोठा दरबार भरविला आणि आकाशवाणीची हकीकत सांगून पुढें काय करावें असें सर्व अमात्यांना विचारलें. कोणीं सुमदेला मारून टाकण्याचा सल्ला दिला तर कोणीं या फंदांत न पडतां परमेश्वरी इच्छेला मान देऊन राहण्याचा उपदेश केला. सर्वांचें म्हणणें ऐकून घेऊन धूम राजा एकांतीं गेला आणि शेवटीं सुमदेला मारून टाकण्याचा बेत कायम करून त्यानें आपला सेनापति **विद्रुम** याला तशी आज्ञा केली.

**विद्रुम** सैन्य घेऊन निघाला तो थेट माधवाच्या घरीं आला आणि सुमदा व माधव हीं दोघें झोंपलीं होतीं त्यांना पलंगासह अलगत उचलून नगराच्या बाहेरच्या रानांत घेऊन गेला. तिथें त्यानें त्या उभयतांना सर्व हकीकत सांगितली आणि हें कृत्य केवळ आपण नाइलाज म्हणून करीत आहों असेंही तो बोलला.

सुमदा म्हणाली, "मी गर्भिणी आहें; मला मारून स्त्रीहत्येचें नि भ्रूणहत्येचें पातक तूं कशाला ओढवून घेतोस? त्यापेक्षां असाच जा नि राजाला सांग कीं मी सुमदेला मारून आलों. यांत खोटें बोलण्याचा दोष येईल खरा; पण परत्राण - विशेषतः स्त्रीरक्षण करण्यांत खोटें बोललें तरी चालतें."

**"संकटे च विवाहार्थे परत्राणे विपत्सु च ।**
**वदन्त्यनृतवाक्यानि अपि सत्यव्रता नराः ॥ १ ॥"**

पण विद्रुमाला हें म्हणणें पटलें नाहीं. तेव्हां सुमदेनें श्रीविष्णूचें स्मरण केलें, तों तिथें नाना शस्त्रें घेतलेले हजारों सैनिक उत्पन्न झाले आणि विद्रुमाच्या मागें लागले. त्यांना पाहून विद्रुम पळून गेला आणि खिन्न वदनानें हा सारा चमत्कार त्यानें धूमाला कथन केला. तो ऐकून धूम अधिकच रागावला आणि त्यानें विद्रुमाचा तिथल्या तिथें शिरच्छेद केला!

पण एवढ्यानें झालें नाहीं. पुढें काय करावें याची काळजी होतीच. राजदरबारांतील **सन** नामक मंत्र्यानें सुचविलें कीं, आतां सुमदेवर सक्त पहारा ठेवावा आणि ती प्रसूत झाली कीं मुलाला मारून टाकावा म्हणजे झालें.

राजानें त्याप्रमाणें चार दिशांना चार सेवक पहाऱ्यावर ठेविले.

पुढें यथाकाल सुमदेचा प्रसूतिसमय प्राप्त झाला. तेव्हां श्रीविष्णूनें विनायक स्वरूपानें तिला दर्शन दिलें. तें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें—

**रक्तांगं श्वेतवसनं चतुर्बाहुं त्रिलोचनं ।**
**मुकुटेन भ्राजमानं कर्णकुंडलधारिणम् ॥ १ ॥**

**धारिणं भालचंद्रं च कमलं परशुं तथा ।**
**मोदकान् भक्षयंतं च मालया चारु शोभितम् ॥ २ ॥**
**शूर्पकर्णं विशालाक्षं प्रभुं विस्तीर्णवक्षसं ।**
**दृष्ट्वा तं पुरुषश्रेष्ठ ( म्ह० हे स्कंदा ! ) उभौ तौ ( म्ह० सुमदा व तिचा नवरा माधव ) प्रापतुर्मुदम् ॥ ३ ॥**

सुमदेनें या वेळीं या दिव्य विभूतीकडे न्याहाळून पाहिलें तों तिला काय दिसलें हेंही विनायकमाहात्म्यांत सांगितलें आहे—

**"मुखांतर्ददृशे चास्य तथाऽष्टौ वसवस्तथा ।**
**इन्द्राश्च मनवश्चैव चतुर्दश सपन्नगाः ॥ १ ॥**
**पर्वताः सरितो यक्षाः समुद्राः काननानि च ।**
**ऋषयो देवगन्धर्वा भुवनानि चतुर्दश ॥ २ ॥"**

याप्रमाणें दर्शन देऊन विनायकानें सुमदेला सांगितलें कीं, 'आतां धूमाला मारून मी स्वस्थानीं जाईन. तुला दुसरा मुलगा होईल तो तुमचें इच्छित पूर्ण करील.' इतकें बोलून त्यानें बालरूप धारण केलें. सुमदेनें त्याला स्तनपान दिलें आणि त्या बालकानें एवढ्या मोठ्यानें गर्जना केली कीं धूमानें ठेवलेले रक्षक भयचकित झाले. त्यांनीं धूमाकडे जाऊन सुमदा प्रसूत झाल्याचें वर्तमान सांगितलें. धूम ताबडतोब सैन्य घेऊन तिथें आला, आणि त्या बालकावर त्यानें एक शस्त्र फेंकलें. तों काय चमत्कार ! त्या बालकानें एकदम गगनभेदी रूप धारण करून धूमाला उचलून तोंडांत टाकलें !

विनायकाला धूमकेतु अथवा धूम्रवर्ण नांव मिळालें तें या पराक्रमामुळें.

## ४ श्रीगणपति आणि रावण

श्रीगणपतीला विघ्नकर्ता व विघ्नहर्ता अशीं दोन्ही नांवें आहेत. पैकीं विघ्नहर्ता म्हणून त्याची आराधना सर्वांनीं करावी हें साहजिक आहे. पण 'विघ्नकर्ता' हें विशेषण ज्याला लावलें जातें त्याची स्तुति काय म्हणून करावी अशी शंका कित्येक प्रदर्शित करतात, त्यांना उत्तर असें कीं, श्रीगणेशाचें हें विघ्नकारकत्व "साधूंच्या परित्राणासाठीं आणि दुष्कृतांच्या विनाशासाठींच" असतें. धर्मसंस्थापनेसाठीं झालेल्या अवतारांचें दुष्कृत्यें करणाऱ्यांना शिक्षा करणें हें जसें एक कार्य असतें, तसेंच त्यांच्या मार्गांत विघ्नें उत्पन्न करून दुष्कृत्यांना आळा घालणें हेंही एक कार्यच असतें. हें कार्य करतांना युक्तिबाजपणा, दूरदर्शीपणा आणि कमींत कमी त्रासांत ज्यास्तींत ज्यास्त लाभ पदरांत पाडून घेणें या गुणांची आवश्यकता असते. श्रीगणेशाच्या अंगीं हे गुण कसे होते हें त्याच्या बालपणच्या एका गोष्टींत चांगलें दिसून येतें. ती गोष्ट अशी—

एकदां लंकेचा राजा रावण कैलासपर्वतावर जाऊन शिवाला प्रसन्न करता झाला. शिवानें 'वर माग' म्हणतांच त्यानें आत्मलिंगच मागितलें! भोळया शंकरानें तें त्याला दिलें, तेव्हां इतर देवांना मोठी काळजी उत्पन्न झाली. त्यांना काय करावें तें सुचेना. तेव्हां त्यांनीं विघ्नकर्त्या गणेशाची प्रार्थना करून रावणाच्या मार्गांत विघ्न उत्पन्न करण्याची त्याला विनंति केली.

इकडे रावण शिवलिंग घेऊन त्वरेनें लंकेला जाण्यासाठीं निघाला. हें लिंग केव्हांही जमिनीवर ठेवावयाचें नाहीं अशी त्याला शंकराची

आज्ञा होती. रावण जातां जातां समुद्रकांठच्या ( सह्यांच्या ) गोकर्ण नामक ठिकाणीं आला. अस्तमान होण्याचा समय होता. संध्येची वेळ झालेली. तेव्हां लिंग कोणाच्या तरी हातीं देऊन संध्या उरकून घ्यावी म्हणून रावण इकडे तिकडे पाहूं लागला.

इतक्यांत नजीकच एक लहान मुलगा खेळत असल्याचें त्यानें पाहिलें. रावणानें त्याचें नांव गांव त्यास विचारलें, तेव्हां त्या मुलानें सरळ आपलें नांव गणेश, बापाचें नांव शंकर व आईचें नांव पार्वती असें सांगितलें! मुलगा हुषार आहे असें पाहून रावण त्याला म्हणाला, "मी संध्या करून येतों. तोंपर्यंत माझ्याजवळचें हें लिंग हातांत घेऊन ठेव. जमिनीवर ठेवावयाचें नाहीं. संध्येहून आलों कीं मी तुला बक्षीस देईन." गणेश म्हणाला, "दे, पण लौकर ये; जड झालें तर मी खालीं ठेवीन!"

दुसरा कांहीं उपायच नसल्यामुळें रावणानें तें लिंग मुलाच्या हातीं दिलें व आपण नजीकच्या तीर्थावर संध्येसाठीं गेला. त्याची संध्या चालू होते न होते तोंच मुलानें रावणाला मोठ्यानें हांक मारून "मला हें लिंग पेलत नाहीं, लौकर ये" म्हणून सांगितलें. रावण संध्या मध्येंच टाकून कसा जाणार? त्यानें 'जरा थांब' म्हणून त्याला हातानें खूण केली. थोडा वेळ गेला. मुलगा पुन्हां ओरडून म्हणाला, "छे! जड झालें; माझ्यानें धरवत नाहीं!" रावण घाईघाईनें संध्या आटपूं लागला, तों मुलगा पुनः ओरडला, "नाहीं रे बाबा! माझ्यानें हें लिंग धरवत नाहीं. माझा हात मोडेल. लौकर ये, नाहींतर हें खालीं ठेवीन!"

रावण कशी बशी संध्या पुरी करून आला. पण तोंपर्यंत मुलानें लिंग जमिनीवर ठेवून दिलें होतें! रावण अतिशय रागावला आणि त्यानें आपल्या हाताची मूठ त्या मुलाच्या डोक्यावर मारली. त्या मारानें खोंक पडून त्यांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. मुलगा रडूं लागला आणि 'आतां वडिलांना जाऊन सांगतों' असें म्हणत तिथून पसार झाला!

रावणानें लिंगाला विळखा घालून तें उपटण्याचा प्रयत्न केला, पण तें कांहीं केल्या जागचें हालेना! अशा रीतीनें शंकराच्या आत्मलिंगाची रावणाच्या हातून सुटका झाली व तें गोकर्णक्षेत्रीं कायमचें बसलें.

रावणाला भेटलेला मुलगा दुसरा तिसरा कोणी नसून शिवपुत्र गणपतीच होता. त्याच्या डोक्यावर खोंक पडली ती मात्र कायम झाली. गणपतीच्या मूर्तींत ती अद्यापि दाखविली जाते.

## ५ पुळयाचा गणपति

लोभासुर या नांवाचा दैत्य होता, त्याला मारण्यासाठीं हा अवतार झाला. याचें स्थान रत्नागिरीच्या उत्तरेस सहा कोसांवर समुद्रकांठीं एका डोंगराच्या पायथ्याशीं आहे. त्याला गणपतिपुळें असें म्हणतात. स्थान रमणीय असून मूर्ति स्वयंभू आहे.

पूर्वीं 'बापट' उपनांवाचे कोणी गृहस्थ गणपतीची आराधना करण्याकरितां येथें आश्रम बांधून राहिले होते. त्यांना श्रीगजाननाचा साक्षात्कार झाला कीं, 'मी दोन गंडस्थळांच्या रूपानें येथील केतकी वनांत आहें, तेथें माझी आराधना केल्यास इष्टसिद्धि प्राप्त होईल.' तेव्हां बापटांनीं तें वन तोडून पहातां तेथें त्यांस तें स्थान सांपडलें. तें त्यांनीं आपल्या तपश्चर्येनें जागृत केलें, तेव्हां तो गणपति नवसास पावूं लागला.

## आणखी कांहीं कथा

सध्यांच्या देवळाच्या मागच्या डोंगराला 'गोल डोंगर' म्हणतात, आणि हा सबंध डोंगरच गणपतिस्वरूप मानून त्याला प्रदक्षिणा घालतात.

'मुद्गल' पुराणांत या स्थानाचें माहात्म्य वर्णिलें आहे. त्यांत

**"सदा दयन्तं गिरिवर्ष्मवन्तम्। श्रियोल्लसन्तं पुलिने वसन्तम्॥**
**गजाननं सागरतीरजं तं। प्रणौमि भक्तेप्सितमावहंतम्" ॥**

हा ध्यानाचा श्लोक सांगितला आहे.

छत्रपति श्रीशिवाजी महाराज एकदां या स्थळीं आले होते, तेव्हां त्यांनीं येथल्या मंदिरास वर्षासन करून दिलें. "मंदिरास लागून भंडारी याचा वाग होता. तो माडी तयार करी. त्यावरून त्या भंडाऱ्यास काढून तेथून दुसरी जागा दिली" असा एका जुन्या कागदांत उल्लेख आहे.

सुमारें अडीचशें वर्षांपूर्वीं या पुळ्यापासून नजीकच असलेल्या कोतवडें गांवचे हरभटबोवा पटवर्धन यांनीं या ठिकाणीं राहून बारा वर्षेंपर्यंत केवळ दूर्वांचा रस सेवन करून श्रीगजाननाची आराधना केली, त्याचें फळ म्हणून त्यांना वाक्सिद्धि प्राप्त झाली आणि त्या सिद्धीच्या जोरावर त्यांची ऐहिक भरभराट होऊन पुढें त्यांच्या पुत्र-पौत्रांनीं मराठशाहींत तरवार गाजवून सत्ता आणि कीर्ति प्राप्त करून घेतली. हे त्यांचे पुत्रपौत्र म्हणजे सांगली-मिरज-कुरुंदवाड-जमखंडी इत्यादि पटवर्धन सरंजामदार संस्थानिकांचे पूर्वज होत. त्यांनीं या देवस्थानाला नेमणुका करून दिल्या आहेत. आजही या साऱ्या पटवर्धन कुटुंबांची या ठिकाणीं भजणूक असून सांगलीकरांनीं देव-ळाचा सभामंडप बांधला आहे. येथें प्रतिवर्षीं भाद्रपद आणि माघ मासीं शुक्ल प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत उत्सव होतात.

येथील धर्मशाळा थोरल्या माधवराव पेशव्यांच्या पत्नी सती रमाबाई यांनीं बांधली आहे.

५

# श्रीगणपति आणि चंद्र

भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशीं चंद्राचें दर्शन घ्यावयाचें नाहीं आणि प्रतिमहिन्याच्या वद्य चतुर्थीला चंद्राचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं असे दोन परस्परविरुद्ध नियम पाळण्याची रूढी अनेक शतकें या देशांतील भाविक हिंदूंमध्यें प्रचलित आहे. त्याचें कारण पुराणांत दिलें आहे तें असें–

एकदां श्रीशंकर कैलास पर्वतावर बसले असतां नारद तेथें आला. त्यानें आपल्याबरोबर एक फळ आणलें होतें. तें त्यानें शंकराला अर्पण केलें. शंकरापाशीं त्याचे मुलगे गजानन व कार्तिकेय बसले होते, ते त्या फळासाठीं भांडूं लागले. तेव्हां शंकराला तें फळ कोणास द्यावें ह्याचा विचार पडला. जवळच ब्रह्मदेवही बसला होता. शंकरानें ब्रह्मदेवाला विचारलें, 'हें फळ कोणास देऊं?' ब्रह्मदेवानें सांगितलें, 'कार्तिकेयाला द्या.' त्याप्रमाणें शंकरानें तें फळ कार्तिकेयाला दिलें. पण त्यामुळें गजाननाला राग आला आणि त्यानें उग्र स्वरूप धारण करून ब्रह्मदेवाला घाबरवून सोडलें. ब्रह्मदेव भ्याला हें पाहून शंकराच्या मस्तकीं असलेल्या चंद्राला मोठी मौज वाटली आणि त्यानें गजाननाच्या त्या प्रासंगिक उग्र रूपाची कुचेष्टा करून मोठ्यानें हास्य केलें.

# श्रीगणपति आणि चंद्र

श्रीगजाननाला अर्थातच चंद्राचा फार राग आला आणि त्यानें त्याला शाप दिला कीं, "मूर्खा, माझ्या स्वरूपाची निंदा करून हंसतोस काय? जा, यापुढें तुझें रूप अगदीं पालटून जाईल आणि त्रैलोक्यांतील कोणताही जीव तुझें दर्शन घेणार नाहीं!"

ह्या शापानें चंद्राचें पूर्वीचें सुंदर स्वरूप अगदीं पालटून गेलें. त्याला मोठी लाज वाटली नि तो लपून राहूं लागला.

स्वर्गांतील देवांना ही हकीकत कळली, तेव्हां ते सर्व एकत्र होऊन श्रीगजाननापाशीं आले आणि त्यांनीं त्याची प्रार्थना केली कीं, "हें काय! सर्व जगाला आल्हाद देणारा हा चंद्र असा निस्तेज झाला तर पुढें जगाची काय स्थिति होईल! तेव्हां यांतून आतां आपणच मार्ग काढा."

श्रीगजाननाला त्यांचें म्हणणें पटलें आणि त्यानें मग आपला शाप मागें घेऊन फक्त भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशीं जो कोणी चंद्राचें दर्शन घेईल किंवा ज्याला चुकूनही त्याचें दर्शन घडेल त्याला महान् विपत्ति प्राप्त होईल; निदान त्याच्यावर खोटा आळ तरी येऊन कष्ट भोगावे लागतील; एरवींच्या दिवशीं हरकत नाहीं—अशी तोड काढून त्याप्रमाणें वागण्याविषयीं सर्वांना बजाविलें!

नंतर इंद्रानें चंद्राला बोलावून आणून त्याच्या वर्तनाबद्दल त्याला दोष दिला व गजाननाला प्रसन्न करून घेण्यासाठीं एकाक्षर मंत्राचा त्याला उपदेश केला. चंद्रानें त्या मंत्राचा बारा वर्षें जप केल्यावर श्रीगजानन संतुष्ट होऊन प्रगट झाले व चंद्राला म्हणाले, "तुझें पूर्वीचें सुंदर रूप तुला प्राप्त होईल आणि प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्थीच्या दिवशीं तुझें दर्शन घेतल्याशिवाय माझी पूजा पूर्ण होणार

नाहीं. त्याचप्रमाणें तुझी एक कला मी भूषण म्हणून मस्तकीं धारण करतों. आजपासून प्रतिमासीं शुद्ध द्वितीयेस लोक तुझें प्रेमानें दर्शन घेतील."

असे वर प्राप्त झाल्यावर चंद्राचा मलिनपणा नाहींसा झाला आणि तो पूर्वींप्रमाणें सतेज झाला.

याचसंबंधाची दुसरी कथा अशी आहे कीं, श्रीगजानन एकदां चंद्र-लोकाला गेला असतां ठेंच लागून खालीं आला; तेव्हां चंद्राला हंसें आलें. तें पाहून गजानन रागावला व त्यानें त्याला "आजपासून तुझें तोंड कोणी पाहणार नाहीं" असा शाप दिला. पण पुढें चंद्रानें पश्चात्ताप पावून प्रार्थना केल्यावर फक्त भाद्रपद शुक्ल चतुर्थीचे दिवशीं कोणीं चंद्रदर्शन करूं नये असें ठरवून गजाननानें हा शाप मागें घेतला.[1]

---

१ या चंद्रदर्शनाच्या निषेधाचा परमार्थदृष्ट्या असा अर्थ लावतात कीं, चंद्र ही मनाची देवता असून मन चंचल आहे. चंद्रदर्शन न घेणें म्हणजे मनोलय करणें. पण सामान्य लोकांना ही उच्च भूमिका समजणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं या दिवशीं चुकून चंद्रदर्शन झालेंच तर त्यावर असा तोडगा काढला कीं, आपणच पहिल्यानें त्या दिवशीं एकाद्याच्या घरावर दगड मारून त्याच्या शिव्या खाव्या म्हणजे पुढली आपत्ति टळेल! हा तोडगा अद्यापि खेड्यांतून पहावयास मिळतो.

* * *

६

# श्रीगणपति आणि उंदीर

आपल्या देवतांत एकेका देवतेचें एकेक वाहन फार प्रिय असें कल्पिलेलें आहे. ब्रह्मदेवाचें कमलपुष्प, विष्णूचा गरुड पक्षी, शंकराचा नंदी, सरस्वतीचा मयूर, इत्यादि वाहनें प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणें श्रीगणपतीचें वाहन मूषक अथवा उंदीर आहे. श्रीगणपतीच्या मूर्तीबरोबर त्याच्या सिंहासनावर एका उंदराचीही स्थापना केली जाते ती याचमुळें. भाद्रपद शुद्ध पंचमीला **उंदीरबी** म्हणतात.

हें उंदीर वाहन गणपतीला प्रिय कां याची कथा आहे ती अशी—

सिंदुरासुर दैत्याला मारण्यासाठीं पार्वतीच्या पोटीं श्रीगजाननाचा अवतार होऊन तो पराशर ऋषीच्या आश्रमांत विद्याभ्यास करीत असतां एके दिवशीं इंद्राच्या सभेंत क्रौंच नामक गंधर्वाचा पाय चुकून वामदेव नांवाच्या ऋषीला लागला. वामदेवानें लगेच त्याला 'तूं मूषक होऊन भूलोकीं पडशील' असा शाप दिला. त्याप्रमाणें तो गंधर्व मूषक होऊन पराशर ऋषीच्या आश्रमाजवळ येऊन पडला. तिथें तो आपल्या स्वभावानुरूप अनेक पदार्थ खाऊन कुरतडून ऋषीला फार त्रास देऊं लागला. तेव्हां एक दिवस गजाननानें आपला पाश त्याच्यावर टाकला. त्या पाशांत सांपडतांच उंदीर विव्हळ झाला.

पण तो मानी होता. गजाननानें त्याला विचारलें, "मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें, तुला काय पाहिजे तें सांग." तेव्हां मूषक म्हणाला, "मला तुझ्यापाशीं कसलाही वर मागावयाचा नाहीं. तुलाच हवा असेल तो वर मजपाशीं माग."

मूषकाचें तें उद्धटपणाचें बोलणें ऐकून "मग तूं आजपासून माझें वाहन हो" असें म्हणून गजानन त्याच्या पाठीवर बसला. तेव्हांपासून गजानन आणि उंदीर यांचा कायमचा संबंध जडून गजाननाला **मूषकवाहन** हें नांव पडलें[1] !

★

१ सिंदुरासुराला मारण्यासाठीं श्रीगजानन गेला तेव्हां तो उंदरावर बसून गेला होता.

ग्रंथालय
ग्रं. नं.
दा. ४६८३
बाजीराव दादा

७

# श्रीगणपति आणि दूर्वा

आपल्या देवतार्चनांत एकेका देवतेला विशिष्ट फल - पुष्प - वनस्पति प्रिय असल्याचें मानलेलें आहे. श्रीविष्णूला तुलसी, शंकराला बेल, त्याप्रमाणें गणपतीला दूर्वा फार प्रिय असल्याचें सांगितलें आहे. कां बरें ?

**अनलासुर** या नांवाचा एक राक्षस होता. त्याच्या डोळ्यांत एवढा प्रचंड अग्नि सांठलेला होता कीं, तो जाईल तिकडे पृथ्वी जळूं लागे. त्याचा आवाजही एवढा मोठा होता कीं, तो ऐकून सारे देव नि दानव गर्भगळित होत. याला कसा मारावा याची सर्वांना मोठी काळजी पडली. शेवटीं सगळे श्रीगजाननाची प्रार्थना करून त्याला म्हणाले, " तूं बुद्धिमान आहेस, तेव्हां या असुराला मारण्याची कांहींतरी युक्ति काढ आणि याच्या जाचांतून आम्हांला सोडव." तेव्हां गजाननानें बालस्वरूप घेऊन अनलासुराला गांठलें आणि जवळ जातांच एकदम भव्य स्वरूप धारण करून त्याला आपल्या पोटांत घेऊन रिचवून टाकलें.

पण यामुळें झालें काय, कीं प्रत्यक्ष अग्निरूपी राक्षसच पोटांत गेल्यामुळें गजाननाच्या अंगाचा दाह होऊं लागला. तेव्हां तो दाह शांत करण्यासाठीं इंद्रानें चंद्र त्याच्या मस्तकावर ठेविला, ( म्हणून त्याला भालचंद्र नांव पडलें. ) ब्रह्मदेवानें सिद्धि आणि बुद्धि अशा दोन मानस-

कन्या त्याला अर्पण केल्या, श्रीविष्णूनें आपल्या हातांतलें कमळ त्याला दिलें, वरुणानें थंडगार पाण्याचा अभिषेक केला, शंकरानें सहस्र मस्तकांचा नाग त्याला अर्पण केला. पण कशानेंही गजाननाच्या देहाची आग शमेना. शेवटीं अठ्यांयशीं सहस्र मुनि जमा झाले आणि त्या प्रत्येकानें एकवीस एकवीस दूर्वा त्याच्या मस्तकीं वाहिल्या तेव्हां त्याचा दाह शांत झाला. म्हणून मग गजाननानें सांगितलें, " अनेक उपायांनीं माझ्या दाहाचें शमन झालें नाहीं तें या दूर्वांनीं झालें. तेव्हां मला दूर्वा अर्पण करील त्याला हजारों यज्ञयाग, व्रतें, दानें, तीर्थे केल्याचें पुण्य लागेल."

हें दूर्वामाहात्म्य पुढील कथेंत तर विशेषच रंगविलें आहे–पूर्वीं दक्षिण देशामध्यें **जांब** या नांवाचें एक नगर होतें. तेथें **सुलभ** या नांवाचा एक क्षत्रिय राहत असे. तो श्रीमान, गुणवान, बलवान, विवेकी व ज्ञानसंपन्न होता. त्याच्या बायकोचें नांव **समुद्रा** असें होतें. तीही महापतिव्रता असून देवता व अतिथि यांच्या पूजनामध्यें तत्पर असे.

त्याच नगरांत **मधुसूदन** या नांवाचा एक ब्राह्मण होता. तो ईश्वरभक्त, पण अत्यंत दरिद्री होता. त्याच्या अंगावरचीं वस्त्रें इतकीं फाटलेलीं असत कीं, तीं अंगावर असलीं तरी **दिगंबर** हेंच विशेषण त्याला सार्थ होतें!

एके दिवशीं हा दिगंबर मधुसूदन भिक्षेसाठीं सुलभाच्या घरीं आला तेव्हां त्याची ती अवस्था पाहून सुलभाला हंसूं आलें. आपल्या दारिद्र्यामुळें हा आपल्याला हंसला या गोष्टीचा मधुसूदनाला अतिशय राग आला आणि त्यानें सुलभाला शाप दिला कीं, " तूं बैल होऊन शेतांतला नांगर ओढीत राहशील!"

समुद्रा जवळच होती. तिला आपल्या पतीचा विशेषसा अपराध नसतां या ब्राह्मणानें असा शाप द्यावा याचें फार दुःख झालें. ती रागानें त्या ब्राह्मणाला म्हणाली, "मूर्खा, तूं अविवेकानें माझ्या पतीला शाप दिलास; तर जा, तूंही गाढव होऊन गांवभर भटकत राहशील!"

ब्राह्मणही संतापलेलाच होता. तो तिला म्हणाला, "तूं यःकश्चित् स्त्री असून मला शाप देतेस काय? तेव्हां तूंही अमंगल आणि दरिद्री चांडाळीण होशील!"

अशा रीतीनें परस्परांच्या शापानें त्या तिघांचेंही जीवित अगदीं बदलून गेलें. **सुलभ** बैल होऊन एका शेतकऱ्याच्या शेतावर नांगर ओढूं लागला, **मधुसूदन** गाढव होऊन गांवांतली हरळी फुंकूं लागला, आणि **समुद्रा** चांडाळणीच्या जन्माला येऊन गांवांत मिळेल तें खाऊन जीवन कंठूं लागली!

पुढें एकदां असा चमत्कार झाला कीं, ती चांडाळीण फिरत फिरत त्या नगराच्या दक्षिण दिशेस असलेल्या श्रीगजाननाच्या देवळाकडे आली. तो दिवस भाद्रपद शुक्ल चतुर्थीचा होता. बाहेर पाऊस पडत असल्यामुळें निवाऱ्यासाठीं म्हणून ती त्या देवळाच्या वळचणींत आली. तिच्या हातांत विस्तव होता. तिनें तेथला पालापाचोळा जमा करून अग्नि पेटविला आणि जवळच हरळी उगवलेली होती ती उपटून त्या अग्नींत टाकून शेकत बसली! इतक्यांत मोठा वारा सुटला आणि तिच्या हातांतल्या हरळीचा–दूर्वेचा–एक अंकुर वाऱ्याच्या सपाट्यानें उडून आंतल्या गजाननाच्या मूर्तीवर जाऊन पडला!

योगायोग असा कीं, तो गाढव नि बैलही फिरत फिरत त्याच वेळीं तिथें आले होते. त्या चांडाळणीनें पेटविण्यासाठीं म्हणून जी हरळी जमा

केली होती ती ते दोघेही खाऊं लागले. ती खात असतांना ते दोघेही एकमेकांशीं भांडूं लागले. गाढव बैलाला लाथा मारीत आहे आणि बैल शिंगांनीं त्या गाढवाला ढोंशीत आहे असें दृश्य दिसूं लागलें. त्या दोघांच्या त्या भांडणांत दोघांच्याही तोंडांतली थोडथोडी हरळी बाहेर पडून त्यांतल्या दूर्वा वाऱ्यानें उडून देवळांतल्या गजाननाच्या मस्तकावर जाऊन पडल्या !

कांहीं वेळानें रात्र झाली आणि श्रीगजाननाचे भक्त देवळांत जमले. त्यांनीं देवाला नैवेद्य अर्पण करून तिथेंच विश्रांति घेतली. चांडाळणीची नजर त्या खाद्य पदार्थांवर जाऊन ती हातांत एक काठी घेऊन आंत गेली. तिच्या मागून तो बैल नि गाढवही आंत शिरले. तेव्हां चांडाळणीनें हातांतल्या काठीचा त्यांच्या पाठीवर प्रहार करून त्यांना देवळाबाहेर घालविलें !

या गडबडीनें गजाननाचे भक्त जागे झाले आणि हातांत काठ्या घेऊन ते त्या तिघांनाही झोडपीत त्यांच्या मागें लागले ! ती चांडाळीण, तो बैल नि तो गाढव जिवाच्या आशेनें पळूं लागलीं, तेव्हां पळतां पळतां सहज त्या देवळाला त्यांची प्रदक्षिणा घडली. पण थकून गेल्यामुळें त्यांच्यानें पुढें जाववेना म्हणून तीं देवळाजवळच अर्धमेलीं होऊन विव्हळत पडलीं !

श्रीगजानन महाराज आंतून हें सर्व पाहात होतेच. ते मनांत म्हणाले, 'आज भाद्रपद शुक्ल चतुर्थीचा दिवस. या दुर्दैवी प्राण्यांजवळच्या दूर्वा माझ्यावर पडल्या. यांनीं मला एक प्रदक्षिणाही घातली. तेव्हां यांचा उद्धार केला पाहिजे.' असें मनांत येऊन त्यांनीं आपल्या गणांना त्या तिघांनाही विमानांतून गणेशलोकीं नेण्याची आज्ञा केली आणि त्याप्रमाणें पुढें तिघेंही उद्धरून त्यांना दिव्य देह प्राप्त झाले.

८

# श्रीगणपतीचें ऐतिहासिक व आध्यात्मिक स्वरूप

श्रीगणपतीचीं अनेक नांवें आहेत. सहस्रनामावळींत एक हजार नांवें दिलेलीं आहेत. तीं बहुतेक विशेषणात्मक असून बरींचशीं एकाच अर्थाचीं आहेत. या नांवांचें विश्लेषण करून श्रीगणेशदेवतेचें ऐतिहासिक व आध्यात्मिक स्वरूप ठरविण्याचा संशोधक प्रयत्न करीत असतात. या प्रकरणांत अशा कांहीं प्रयत्नांची ओळख करून द्यावयाची आहे.

प्रथम **श्रीगणेश** अथवा **गणपति** हेंच नांव घेऊं. यांत **गण+ईश** अथवा **गण+पति** असे दोन शब्द आहेत. **गण** याचा अर्थ संघ अथवा समूह; आणि **ईश** किंवा **पति** म्हणजे स्वामी किंवा नायक. यावरून गणेश किंवा गणपति हा एका काळीं तत्कालीन गणांचा म्हणजे सामाजिक संघांचा स्वामी, प्रतिनिधि किंवा प्रमुख असावा असें अनुमान होतें. **गुणेश** यांत गुण+ईश असे शब्द असून गुण म्हणजे सत्त्व-रज-तम या तीन तत्त्वांचा ईश म्हणजे स्वामी असा त्याचा अर्थ.

गणेश - गुणेशांसंबंधाचें पुढील विवरणही विचाराला चालना देणारें आहे. "त्रिगुणात्मकतेच्या कल्पनेशिवाय इतर अनेक **गुणांचा ईश** म्हणूनही गणपति पूजार्ह मानला जाणें शक्य आहे व **गणेश** या विशेषनामाशीं ते गुण जुळते असले तर **गुणेश - गणेश** हें जोड विशेषनाम त्याला अधिकच खुलून दिसण्यासारखें आहे."

या दृष्टीनें एका चिकित्सक लेखकानें श्रीगणेशाच्या अंगच्या गुणांचें वर्णन करतांना पुढील माहिती संकलित केली आहे– " श्रीगणेश हा शरीरानें दणकट हाडांचा ( मेरुपृष्ठ ) व पुष्ट दंडांचा ( गुरुभुज ) होता, त्याचें कपाळ विस्तीर्ण होतें ( विशालभाल ) व त्याचा एकंदर शरीराकार भव्य होता ( भव्याकार ). तसेंच त्याचें शरीर कांतिमान होतें ( गुरुकांति ), त्याचा स्वर गंभीर होता ( गंभीरस्वर ), तो आजन्म ब्रह्मचारी होता व त्यामुळें त्याची प्राणशक्ति प्रचंड होती."

"श्रीगणेशाला गदा, खड्ग, शूल, चाप, परशु, मुद्गल इत्यादि आयुधें फार चांगल्या रीतीनें वापरतां येत होतीं. सेनेची रचना व सुव्यवस्था या बाबतींत तो प्रवीण होता. आणि म्हणून त्याला **गणमंडलाध्यक्ष** असेंही म्हणत. तो उत्तम योद्धा होता. युद्धाचे त्याचे बेत गुप्त असत व त्यामुळें त्याला अपयश असें कधींच आलें नाहीं. त्यानें देव, ऋषि, मनुष्य आणि गंधर्वादिकांना अनेक प्रसंगीं साह्य केलें."

"श्रीगणेश हा उत्तम लेखक असून व्यासांनीं आपलें भारत त्याच्याकडूनच लिहविलें होतें. श्रीगणपतीच्या अंगीं उच्च कलांचा विलासही उत्तम होता. तो उत्तम वक्ता होता. त्याला चांगलें गातां येत असे. त्याला गणितविद्या अवगत असे आणि वैद्यकविद्येंतही तो प्रवीण होता."

## श्रीगणपतीचें स्वरूप

"ब्रह्मा, विष्णु, महेश, इंद्र, अग्नि, वायु, सूर्य, चंद्र इत्यादि सर्व देवतांच्या अंगचे गुण त्याच्या अंगीं एकवटले होते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे उत्कृष्ट बुद्धिमत्ता, दांडगी इच्छाशक्ती, अतुल पराक्रम आणि शमदमादि साधनसंपन्नता यांनीं तो परिपूर्ण होता. तेव्हां अशा या देवावर साऱ्या लोकांची भक्ति बसून त्यांनीं त्याला आपल्या नित्य-नैमित्तिक कृत्यांच्या आरंभीं आदरानें वंदन करण्याचा प्रघात पाडला यांत नवल काय?"

गजानन, वक्रतुंड, लंबोदर, इत्यादि कित्येक नांवांचा उत्तान अर्थच घेऊन जे गणेशस्वरूपाला नाक मुरडतात त्यांनीं पुढील स्पष्टीकरण लक्षांत घ्यावें—

### गजानन

रुद्र म्हणजे शिव व त्याची पत्नी पार्वती हीं गजचर्म पांघरीत असत. ज्या अरण्यांत रुद्राचा व त्याच्या विनायक वगैरे गणांचा वास असे, तें स्थान हत्तींसाठीं प्रसिद्ध होतें. तेव्हां वन्य पशूंत विशेष बुद्धि-मान जो हत्ती त्याचें शिर शिवपार्वतीच्या पुत्राला जोडण्याची क्लृप्ति पुराणकालीं निघाली असली पाहिजे.

### वक्रतुंड

**वक्र** म्हणजे कुटिल - वांकड्या मार्गानें जाणारा आणि तुंड् - तोडणें, नाश करणें. यावरून **वक्रान् तुंडयति** म्हणजे "वांकडे, कुटिल, वांकड्या मार्गानें आक्रमण करणारे असतील त्यांचा नाश करणारा" तो वक्रतुंड होय.†

† ही व्युत्पत्ति 'विनायकमाहात्म्यांत'च दिलेली आहे.

श्री ९ ५१ —

## एकदंत

**दम्** - दमन करणें यावरून **दन्ती** याचा दमन करणें असा अर्थ आहे. **एकदंत** म्हणजे षड्रिपूंपैकीं **पहिला रिपु** जो काम त्याचें—एका मोठ्या शत्रूचें—दमन करणारा तो एकदंत.

## लंबोदर

ज्यांत अखिल विश्व सामावलें आहे असें ब्रह्म तो लंबोदर. श्रीएकनाथ महाराज म्हणतात :—

**तुजमाजी वस्तु चराचरा । म्हणोनि बोलिजे लंबोदरा ।**
**यालागीं सकळांचा सोयरा । साचोकारा तूं होसी ॥ १ ॥**

## शूर्पकर्ण

कान मोठे असणें हें सर्वांचें ऐकून घेण्याचें सूचक आहे असें मानतात. शिवाय पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा हीं ज्याच्या कर्णांच्या ठिकाणीं आहेत तो शूर्पकर्ण असाही अर्थ केला जातो. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात :—

**"मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ॥**
**बोधमदामृत मुनी । अली सेविती ॥ १ ॥**

... ..........................

## श्रीगणेशस्वरूप

श्रीगणपतीचें सध्यांचें जें स्वरूप आहे तें ॐ या प्रणवोङ्काराचें प्रतीक आहे असें मानण्यांत येतें.‡ श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

**"अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल ।**
**मकार महामंडल । मस्तकाकार ॥ १ ॥**
**हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ॥**
**तें मियां गुरुकृपें नमिलें । आदिबीज ॥ २ ॥"**

---

‡ **ॐ, श्री** आणि **अथ** हे मंगलार्थी शब्द आहेत.

तुकाराम महाराजही म्हणतात—

**"ॐकार प्रधान । मुख गणेशाचें ॥***
**हें तिन्ही देवांचें । जन्मस्थान ॥ १ ॥**

**अकार तो ब्रह्मा । उकार तो विष्णू ॥**
**मकार महेश । जाणियेला ॥ २ ॥**

**तिन्ही देव जाले । जेथूनि निर्माण ॥**
**तो हा गजानन । मायबाप ॥ ३ ॥"**

एकनाथ महाराजांनीं श्रीगणेशाच्या हातांतील आयुधांचें व खाद्य पदार्थांचें वर्णन करतांना पुढील उद्गार काढले आहेतः—

**ज्ञानतेजें सतेज फरशु । नित्यस्मरणाचा अंकुशु ।**
**आनंदमोदकाचा सुरसु । मुखीं देसी घांसू निजभक्तां ॥**

म्हणजे गणपतीच्या हातांतील परशु ज्ञानतेजानें तेजस्वी झालेला असून नित्यस्मरणरूपी अंकुश त्यानें धारण केला आहे. तसेंच तो आपल्या भक्तांच्या मुखांत आनंदरूपी मोदकांचे घांस घालतो म्हणजे त्यांस ब्रह्मप्राप्ति करून देतो हा अर्थ.

गणपतीच्या उंदीर या वाहनासंबंधानें आध्यात्मिक दृष्ट्या विचार करतांना एका चिकित्सकानें असें म्हटलें आहे कीं "मूषक म्हणजे उंदीर

---

* गणपतीच्या चालू स्वरूपांत त्याची सोंड बहुधा डावीकडे वळविलेली असते. क्वचित् उजव्या सोंडेचे गणपति दिसतात. पण त्याबद्दलची समजूत अशी आहे कीं, हें उजव्या सोंडेचें ध्यान अतिशय प्रखर असतें. असलें दैवत ज्याच्या घरीं असेल त्यानें त्याच्या पूजाविधीचे नियम कटाक्षानें पाळले पाहिजेत. तसे ते पाळले तर ही देवता यजमानाला वैभव प्राप्त करून देते. पण तीच प्रतिकूल झाली तर त्यास धुळीला मिळवते. म्हणून अशा उजव्या सोंडेच्या गणपतीस भाविक लोक फार भितात.

हा कालरूप समजावयाचा आहे. उंदीर ज्याप्रमाणें अहर्निश पदार्थमात्र कुरतडीत असतो, तद्वत् कालही सृष्ट पदार्थांचा सारखा नाश करीत आहे. या कालालाच ज्यानें जिंकून आपलें वाहन बनविलें तो केवढा श्रेष्ठ म्हणावा ?"

याशिवाय 'श्रीगणपति अथर्वशीर्षा'त गणपतीला 'मूषकध्वज' असें म्हटलें आहे, त्यावरून पूर्वीं मूषक हें गणपतीचें ध्वजचिन्ह होतें अशी उपपत्तीही एकानें बसविली आहे.

गणपतीला दूर्वा, शमी, मांदार इत्यादि ज्या वस्तु प्रिय मानल्या आहेत, त्यांची उपपत्तीही कित्येकांनीं या पदार्थांच्या वैद्यकीय गुणधर्मांवर बसविली आहे. दूर्वा या वनस्पतीला **जीवनी** असें वैद्यक ग्रंथांत म्हटलें आहे. दूर्वांचा रस पिऊन बारा वर्षें तपश्चर्या केल्याचें आधुनिक इतिहासांतलें उदाहरण दक्षिणेंतील पटवर्धन सरदारांचे मूळ पुरुष हरभटबावा यांचें प्रसिद्धच आहे. **शमीचा** उपयोग इसबादि त्वग्रोगांवर चांगला होतो. **रुईला** वानस्पत्य पारा असें म्हणतात. म्हणजे रसांमध्यें पाऱ्याला जें महत्त्व तेंच वनस्पतींमध्यें रुईला आहे. कारण या एका वनस्पतीच्या साह्यानें मनुष्याला होणारे अनेक रोग नाहींसे होतात. तेव्हां गणपतीला या वस्तु अर्पण करण्याच्या परिपाठाचा अर्थ असा कीं,—स्वतः गणेश आपल्या अवताराच्या समयीं या वनस्पतींनीं लोकांची चिकित्सा करीत असे, व त्या कामासाठीं त्यास या वनस्पतींचा प्रत्यहीं उपयोग होत असे. यासाठीं त्याला हव्या तेवढ्या वनस्पति अनायासें मिळाव्या म्हणून त्याच्या अनुयायांनीं त्या त्याला अर्पण कराव्या असा दंडक त्या वेळीं घालण्यांत आला—('पुरुषार्थ' गणेश अंक) व तो पुढें देवतापूजनाच्या वेळीं पाळण्याची रूढी पडली.

आतां गणपतीच्या असुरवधासंबंधाची उपपत्ति सांगून हें प्रकरण पुरें करूं.

मुद्गल पुराणांत इतर असुरांप्रमाणेंच कामासुर, क्रोधासुर, लोभासुर, मोहासुर, मदासुर व मत्सरासुर अशा नांवांचे असुर सांगितले असून त्या सर्वांचा नाश गणेशानें केल्याचीं वर्णनें आहेत. हे असुर म्हणजे अर्थात् आसुरी संपत्तीचे दुर्गुण होत. आपल्या अंतःकरणांत केव्हां कामविकाराचें राज्य होतें; केव्हां क्रोध, लोभ, मत्सर इत्यादिकांचें राज्य होतें; व त्या त्या वेळीं दैवी संपत्ति दबली जाते हाच देवांचा पराभव होय.

पुढें विश्वात्मा गणेश याचें यथार्थ ज्ञान झालें म्हणजे कामक्रोधादि मनोविकार हतबल होऊन पुनः मनुष्य दैवी संपत्तीनें युक्त होतो म्हणजेच असुरांचा–आसुरी संपत्तीच्या दुर्गुणांचा–नाश होऊन देवांचा –सत्य–अहिंसादि दैवी संपत्तीच्या गुणांचा–जय होतो हेंच असल्या कथांचें सार आहे.

९

# समारोप

हिंदुमात्राला पूज्य असलेल्या श्रीगणेश देवतेच्या कथा व तिच्या नामरूपांचीं पुराणांतील वर्णनें यांची जी माहिती आतांपर्यंत देण्यांत आली, त्यावरून एक गोष्ट वाचकांच्या लक्षांत आली असेलच कीं, परमेश्वराच्या पराक्रमाच्या कथा किंवा त्याच्या स्तुतिपर जीं अनेकानेक नांवें पुराणांतून किंवा कवींच्या काव्यांतून आढळतात, अगर त्याच्या पूजेअर्चेचे जे प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात, त्यांच्या केवळ उत्तान अर्थाकडेच लक्ष दिल्यानें पुष्कळ वेळां सामान्य लोकांच्या मनांत भ्रम उत्पन्न होण्याचा संभव असतो. त्यापेक्षां परमेश्वर सर्वशक्तिमान आहे, त्याचें स्वरूप अवर्णनीय आहे, त्याला कोणत्याही नांवानें हांक मारली तरी ती अंतःकरणाच्या उमाळ्यांतून निघाली असेल तर तो धांवून आल्याशिवाय राहात नाहीं आणि त्याची पूजा कोणत्याही उपचारांनीं केली तरी ती खऱ्या भक्तिभावानें केली तर तो प्रसन्न झाल्याशिवाय राहात नाहीं ही खूणगांठ मनांत बांधूनच त्याची उपासना करावी. श्रीमद्भगवद्गीतेंत

**'पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।'**

असें स्पष्टच सांगितलें आहे.

## समारोप

दुसरी गोष्ट ज्या देवतेची—म्हणजे परमेश्वरस्वरूप ज्या प्रतीकाची उपासना करावयाची तिचें मूलतत्त्व काय आहे हें लक्षांत घ्यावें. कोणत्याही मूर्तीच्या पूजेंत बाह्य आकृतीला महत्त्व नसून त्या मूर्तीनें व तिच्याशीं संबंध असलेल्या कथांनीं ज्या दैवी गुणांचें स्मरण होतें, त्यांना प्राधान्य असतें. पण अलीकडे या गोष्टींकडे फार दुर्लक्ष होत असून देवापेक्षां बाहेरच्या देखाव्याकडेच लोकांचें अधिक लक्ष असतें. लोक

**"देवा सोडूनियां देऊळ भजती"**

असें जें तुकोबांनीं म्हटलें आहे तें यालाच अनुलक्षून. तेव्हां कोणत्याही प्रतीकाची उपासना करतांना त्याच्या मागच्या दैवी गुणांकडे लक्ष असावें. समर्थ रामदास स्वामीही सांगतात—

**ध्यान देवाचें करावें । किंवा देवाल्याचें करावें ॥**
**हेंचि बरें विवरावें । आपले ठाईं ॥**

**इति शम्**

★

# सार्थ व संक्षिप्त पूजा

## प्रास्ताविक

सध्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या काळांत एकीकडे देव आणि भक्त यांच्यामध्यें 'दलाल' नको हें मत बळावत आहे तर दुसरीकडे हा दलालांचा वर्ग आपोआपच दुर्मिळ होत आहे. मात्र हिंदुस्थानचा पिंडच धार्मिक असल्यामुळें येथें देवांचें अजीबात उच्चाटन करण्याचे कोणीं कितीही प्रयत्न केले तरी त्यांत यश येणें शक्य नाहीं. फार तर देवपूजेचे प्रकार बदलतील. श्रीगणेशाच्या त्याचप्रमाणें इतर देवतांच्याही वार्षिक सार्वजनिक उत्सवांच्या वाढत्या संख्येवरून ही गोष्ट कोणालाही स्पष्ट समजण्यासारखी आहे.

मात्र इतर देवांच्या पूजांप्रमाणेंच नित्य-नैमित्तिक नि वैयक्तिक वा सार्वजनिक श्रीगणेशपूजेच्या तांत्रिक विधींत छाटाछाट करून सामान्य लोकांना सहज झेपेल व कळेल एवढाच पूजाविधि त्यांच्यापुढें ठेविला तर त्याचा फार उपयोग होईल असें अलीकडे अनेकांना वाटूं लागलें आहे. म्हणून श्रीगणपतीच्या उत्सवप्रसंगीं विशेषतः वार्षिक उत्सवाच्या वेळीं सर्वांना सहज समजेल व आचरितां येईल अशी ही **सार्थ** व

संक्षिप्त पूजा त्यांच्या हातीं देत आहों. संकष्टचतुर्थीसारख्या व्रत-दिवशीं करावयाच्या पूजेंत संकल्पाचा उच्चार करतांना व निरनिराळे उपचार समर्पण करतांना अवश्य तो शाब्दिक बदल करावा म्हणजे झालें. श्रीगजानन आमची ही सेवा गोड करून घेवो अशी त्याच्या चरणीं प्रार्थना आहे.

## भाद्रपद शुक्ल चतुर्थी

या दिवशीं घरोघर ज्या गणेशावताराची पूजा करतात त्याचें नांव **श्रीसिद्धिविनायक** असें आहे. या पूजेचा शास्त्रोक्त विधि म्हणजे त्या दिवशीं श्रीगजाननाची मातीची प्रतिमा करून तिची पूजा करणें आणि दीड दिवस ( किंवा कुटुंबांत चाल असेल त्याप्रमाणें किंवा तसा नवस केलेला असेल तर ) पांच, सात, दहा अगर एकवीस दिवस सतत पूजन करून नंतर त्या मूर्तीचें पाण्यांत विसर्जन करणें. पंचमीच्या दिवशीं गणपतीच्या वाहनाची - उंदराची पूजा करण्याची चाल असून त्याच्या नांवानें काढून ठेवलेला नैवेद्य मूर्तिविसर्जनानंतर घराबाहेर नेऊन ठेवण्याची चाल कित्येक कुटुंबांत आहे.

ज्या कुटुंबांत ज्येष्ठागौरीच्या उत्सवाची प्रथा असते, त्या कुटुंबांत बहुधा गौरी - गणपतीचें एकाच दिवशीं बरोबरच विसर्जन करतात.

वर सांगितलेल्या मुख्य विधीशिवाय मूर्तीसमोर गायन, पुराण-कथा - कीर्तन वगैरे करणें आणि अलीकडे सार्वजनिक उत्सवांत व्याख्यानें - मेळे - नाटक - नाटिका इत्यादि कार्यक्रम करणें हे प्रकारही चालतात. पण तीं कांहीं या उत्सवाचीं मुख्य अंगें नव्हत.

२३०१४३

## पूजेचे सामान्य नियम

( १ ) ही पूजा जेवणापूर्वीं सामान्यतः मध्यान्हाच्या सुमाराला पवित्रपणानें—स्नान करून व धूतवस्त्र नेसून प्रसन्न मनानें करावी.

( २ ) पूजा करतांना देवाशिवाय दुसरीकडे लक्ष असूं नये. उगाच आरडाओरडा करणें, बडबड करणें, मुलांबाळांवर रागावणें इत्यादि गोष्टी कटाक्षानें टाळाव्या.

( ३ ) पूजेची जागा अगोदरच झाडून पुसून स्वच्छ केलेली असावी. आपल्या बसावयाच्या जागेपेक्षां देव ठेवण्याची जागा उंच असावी. तसेंच देवाचें आसन स्वतःच्या आसनापेक्षां उच्च प्रतीचें असावें.

( ४ ) देवाला समर्पण करावयाचे जिन्नस - पाण्यापासून उंची पक्वान्नापर्यंत - सर्व स्वच्छ व पाहतांच मनाला आल्हाद देणारे असावे.

( ५ ) बाह्य उपचारांपेक्षां अंतःकरणांतील भक्तिभावाकडेच देवाचें लक्ष असतें. म्हणून बाह्य उपचार कमी झाले तरी चालतील, पण पूजेच्या वेळीं अंतःकरण निर्मळ असावें.

( ६ ) पूजेच्या वेळीं व ठिकाणीं नीटनेटकेपणा व शांतता असली म्हणजे त्याचा साधकाच्या व इतरांच्या मनावर चांगला परिणाम होतो. शांत जागीं, फुलांचा मधुर वास सुटला आहे, प्रत्येक वस्तु जागच्या जागीं मांडलेली आहे, घरांतील माणसें आनंदानें मदत करीत आहेत आणि सर्व काम शिस्तीनें चाललें आहे असें दृश्य कोणाला आनंद देणार नाहीं ? अशानें सर्वसाक्षी परमेश्वरही संतुष्ट होणारच.

## पूजेसाठीं आवश्यक साहित्य

स्वतःसाठीं बसावयाला लांकडाचा पाट, पाण्यासाठीं एक तांब्या किंवा

लोटी, पंचपात्री किंवा फुलपात्र, तांब्याची किंवा पितळेची पळी, ताम्हन, समई, नीरंजन, धुपारतीचें भांडें, उदबत्तीचें घर, पंचामृत व नैवेद्यासाठीं वाट्या, गंध, फुलें इत्यादि ठेवण्यासाठीं ताट, पाहुण्यांना बसण्यासाठीं सतरंजी किंवा चटई इतकें तरी साहित्य पूजेला सुरवात करण्यापूर्वीं तयार ठेवावें.

## पूजेचे दोन प्रकार

कोणत्याही देवतेच्या पूजेचे (१) षोडशोपचार (सोळा उपचारांची पूजा) व (२) पंचोपचार (पांच उपचारांची पूजा) असे दोन प्रकार असतात.

**षोडशोपचारांत** पहिलें **ध्यान** झाल्यानंतर (१) **आवाहन** = बोलावणें, आमंत्रण करणें, (२) **आसन**, (३) **पाद्य** = पाय धुण्याकरतां पाणी देणें, (४) **अर्घ्य** = पाण्यांत गंध, अक्षता व फुलें घालून देवतेला वाहणें, (५) **आचमन**, (६) **स्नान** [यांतच पचामृत-स्नान व महाभिषेकस्नान यांचा अंतर्भाव होतो], (७) **वस्त्र**, (८) **उपवस्त्र**, (९) **विलेपन** = चंदन, हळद, कुंकूं, बुक्का, शेंदूर इत्यादि वहाणें, (१०) **पुष्प** [दूर्वा, पत्री इत्यादिकांचा यांतच समावेश होतो], (११) **धूप**, (१२) **दीप**, (१३) **नैवेद्य**, (१४) **प्रदक्षिणा**, (१५) **नमस्कार**, (१६) **मंत्रपुष्प** [आरती, प्रार्थना इत्यादिकांसह] इतक्या गोष्टींचा समावेश होतो.

**पंचोपचारांत** यांपैकीं फक्त (१) **गंध**, (२) **पुष्प**, (३) **धूप**, (४) **दीप** आणि (५) **नैवेद्य** यांचा समावेश होतो. हा अगदीं त्रोटक पूजेचा प्रकार आहे. प्रदक्षिणा, नमस्कार, आरती आणि

मंत्रपुष्प या गोष्टी सामान्यतः कोणत्याही पूजाप्रकाराच्या शेवटीं करतात.

## प्रास्ताविक विधि

कोणत्याही देवतेच्या पूजेला आरंभ करण्यापूर्वी **आचमन, प्राणायाम** व **संकल्प** ह्या गोष्टी प्रास्ताविक म्हणून करावयाच्या असतात.

**आचमन** म्हणजे पोटांत पाणी घेणें. उजव्या हाताच्या आंगठ्या-जवळील बोट मिटून आंगठ्याच्या मूळावर टेकलें म्हणजे तळहाताची जी आकृति होते तिला **गोकर्णाकृति** म्हणतात. तळहाताच्या अशा गोकर्णाकृतींत डाव्या हातांतल्या पळीनें पळीभर पाणी घेऊन तें पोटांत घेतलें म्हणजे एक आचमन होतें.

**प्राणायाम– प्राण** म्हणजे श्वासवायु आणि **आयाम** म्हणजे निरोध. प्राणायाम म्हणजे प्राणवायूचा निरोध-प्राणवायु कोंडणें. प्राणायाम **पूरक, कुंभक** आणि **रेचक** या तीन कृतींनीं पूर्ण होतो. पूरक म्हणजे श्वास आंत घेणें, कुंभक म्हणजे आंत घेतलेला श्वास स्थिर करणें आणि रेचक म्हणजे स्थिर केलेला श्वास बाहेर सोडणें.

प्रथम उजव्या हाताच्या आंगठ्यानें उजवी नाकपुडी दाबून डाव्या नाकपुडीनें श्वास आंत घ्यावा. मग सर्व बोटांनीं दोन्ही नाकपुड्या दाबून श्वास स्थिर करावा आणि नंतर उजव्या नाकपुडीवरील आंगठा काढून श्वास बाहेर सोडावा म्हणजे एक प्राणायाम पुरा होतो.

**संकल्प** म्हणजे कोणत्याही कृत्याचा हेतु सांगणें.

कोणत्याही पूजेच्या आरंभीं श्रीविष्णूचीं चोवीस नांवें उच्चारून त्याला प्रणाम = नमस्कार करावयाचा असतो. तीं नांवें येणेंप्रमाणें—

## आचमन व प्रणाम

ॐ केशवाय नमः। नारायणाय नमः।
माधवाय नमः। गोविंदाय नमः।
विष्णवे नमः। मधुसूदनाय नमः।
त्रिविक्रमाय नमः। वामनाय नमः।
श्रीधराय नमः। हृषीकेशाय नमः।
पद्मनाभाय नमः। दामोदराय नमः।
संकर्षणाय नमः। वासुदेवाय नमः।
प्रद्युम्नाय नमः। अनिरुद्धाय नमः।
पुरुषोत्तमाय नमः। अधोक्षजाय नमः।
नारसिंहाय नमः। अच्युताय नमः।
जनार्दनाय नमः। उपेंद्राय नमः।
हरये नमः। श्रीकृष्णाय नमः।

[ यांतील पहिल्या तीन नांवांनीं तीन आचमनें करावीं, पुढलीं नांवें नुसतींच उच्चारावीं. ]

## प्राणायाम

ॐ प्रणवस्य परब्रह्म ऋषिः। परमात्मा देवता। दैवी गायत्री छंदः। प्राणायामे विनियोगः। ॐ भूः ॐ भुवः ॐ स्वः ॐ महः ॐ जनः ॐ तपः ॐ सत्यम्।

ॐ भूर्भुवः स्वः। ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि। धियो यो नः प्रचोदयात्॥

ॐ आपो ज्योती रसोमृतं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम्।

[ जो आमच्या बुद्धीला प्रेरणा करतो त्या तेजस्वी सूर्याचें आम्ही ध्यान करतों. ]

असें म्हणून प्राणायाम करावा.

## संकल्प

तिथिर्विष्णुस्तथा वारो नक्षत्रं विष्णुरेव च।
योगश्च करणं चैव सर्वं विष्णुमयं जगत्॥

**अद्यपूर्वोच्चरितवर्तमान एवंगुणविशेषणविशिष्टायां शुभपुण्यतिथौ। मम आत्मनः अस्माकं च सर्वेषां सकुटुंबानां क्षेम-स्थैर्य-विजय-अभय-आयुरारोग्य-ऐश्वर्याभिवृद्ध्यर्थं द्विपदचतुष्पदानां शांत्यर्थं पुष्ट्यर्थं तुष्ट्यर्थं समस्तमंगलावाप्त्यर्थं समस्ताभ्युदयार्थं च इष्टकामप्रजासंसिद्ध्यर्थं कल्पोक्तफलावाप्त्यर्थं श्रीसिद्धिविनायकदेवताप्रीत्यर्थं यथाज्ञानेन यथामीलितोपचारद्रव्यैः ध्यानावाहनादिषोडशोपचारपूजनमहं करिष्ये॥**

[ तिथि, वार, नक्षत्र, योग आणि करण हे कालभेद विष्णुमय आहेत, इतकेंच काय पण हें सर्व जगच विष्णुमय आहे.

तेव्हां अशा या शुभ व पुण्य दिवशीं आमच्या साऱ्या कुटुंबाच्या कल्याणासाठीं, आम्हांला स्थैर्य, विजय, अभय, आयुष्य, आरोग्य, ऐश्वर्य त्याचप्रमाणें आमच्याकडे असलेले द्विपाद व चतुष्पाद प्राणी यांनाही शांति, पुष्टि व तुष्टि प्राप्त व्हावी म्हणून; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आम्हां सर्वांचें मंगल-कल्याण व्हावें, आमचा सर्वांचा अभ्युदय व्हावा, आणि आमच्या सर्व इच्छा परिपूर्ण व्हाव्या म्हणून मी जें कांहीं थोडेंबहुत ज्ञान मला प्राप्त झालें आहे, त्याप्रमाणें आणि जें कांहीं थोडेंबहुत पूजा-द्रव्य मला मिळालें आहे त्यानें या श्रीसिद्धिविनायकाची ध्यान, आवाहन इत्यादि सोळा उपचारांनीं पूजा करतों. ]

**असें म्हणून उजव्या हातांत पाणी घेऊन ताम्हनांत सोडावें.**

**तथा च कलश शंख-घंटापूजनं दीपपूजनं मंडपपूजनं च करिष्ये।**

[ त्याचप्रमाणें कलश, शंख, घंटा आणि दीप व मंडप यांचेंही पूजन करतों. ]

**पूर्वींप्रमाणें पाणी सोडावें.**

**आदौ निर्विघ्नतासिद्ध्यर्थं महागणपतिस्मरणं च करिष्ये।**

[ त्यापूर्वीं प्रथम ही पूजा निर्विघ्नपणें तडीस जावी म्हणून श्रीमहागणपतीचें स्मरण करतों. ]

**पूर्वींप्रमाणें पाणी सोडावें.**

## महागणपतिस्मरण

**वक्रतुंड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ।**
**निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥**

**श्रीमन्महागणपतये नमो नमः ।**

[ हे वक्रतुंड, महाकाय, कोटि सूर्यांप्रमाणें तेज असणाऱ्या देवा ! माझीं सर्व कामें नेहमीं निर्विघ्नपणें तडीस जावोत. ]

असें म्हणून हात जोडावे.

## कलशपूजा

**कलशस्य मुखे विष्णुः कंठे रुद्रः समाश्रितः ।**
**मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाः स्मृताः ॥**
**कुक्षौ तु सागराः सर्वे सप्तद्वीपा वसुंधरा ।**
**ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणः ॥**
**अंगैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्रिताः ।**
**अत्र गायत्री सावित्री शांतिपुष्टिकरी तथा ॥**
**आयांतु देवपूजार्थं दुरितक्षयकारकाः ।**
**गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।**
**नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु ॥**

**श्रीवरुणाय नमः गंधाक्षतपुष्पाणि समर्पयामि ।**

[ कलशाच्या मुखाच्या ठिकाणीं विष्णु, कंठाचे ठिकाणीं रुद्र, मूळाचे ठिकाणीं ब्रह्मा आणि मध्यभागीं मातृदेवता वास करोत. कुक्षींत सर्व समुद्र, सप्तद्वीपांनीं युक्त असणारी पृथ्वी नि षडंगांसहित चार वेद प्राप्त होवोत. येथें शांति आणि पुष्टिकरी गायत्री व सावित्री, त्याचप्रमाणें गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधु, कावेरी इत्यादि नद्या या येथल्या पाण्यांत प्राप्त होवोत. वरुणा ! तुला नमस्कार. मी तुला गंध, अक्षता व फुलें अर्पण करतों. याचा स्वीकार कर. ]

असें म्हणून कलशाला गंध, अक्षता नि फुलें वहावीं.

## शंखपूजा

**शंखादौ चंद्रदैवत्यं कुक्षौ वरुणदेवता ।**
**पृष्ठे प्रजापतिश्चैव अग्रे गंगासरस्वती ॥**
**त्वं पुरा सागरोत्पन्नो विष्णुना विधृतः करे ।**
**अग्रतः सर्वदेवानां पांचजन्य नमोस्तु ते ॥**

**शंखदेवतायै नमः सर्वोपचारार्थे गंधपुष्पं समर्पयामि ।**

[ शंखाच्या मूलभागीं चंद्र, कुशींत वरुण, पृष्ठभागीं प्रजापति व अग्रभागीं-गंगा-सरस्वती वास करतात. हे पांचजन्यनामक शंखा! तूं पूर्वी सागरांत उत्पन्न झालास, श्रीविष्णूनें तुला हातीं धरलें, सर्व देवांच्या अग्रभागीं तुझें वास्तव्य, म्हणून माझा तुला नमस्कार ! ]

याप्रमाणें म्हणून शंखाला गंध-फूल वहावें.

## घंटापूजा

आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम् ।
कुरु घंटे रवं तत्र देवताह्वानलक्षणम् ॥

घंटायै नमः सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

[ हे घंटे, देवांच्या आगमनाकरतां व राक्षसांना दूर करण्याकरतां तूं नाद कर. ]

असें म्हणून घंटेला गंध, अक्षता व पुष्पें वहावीं.

## दीपपूजा

भो दीप ब्रह्मरूपस्त्वं ज्योतिषां प्रभुरव्ययः ।
आरोग्यं देहि पुत्रांश्च सर्वार्थांश्च प्रयच्छ मे ॥
दीपाय नमः गंधपुष्पं समर्पयामि ।

[ हे दीपदेवते ! तूं ब्रह्मरूप आहेस, तूं सर्वांपेक्षां तेजस्वी आहेस, कधींही क्षीण होणारी नाहींस. मला आरोग्य आणि पुत्र देऊन माझ्या सर्व इच्छा पूर्ण कर. ]

असें म्हणून दिव्याला गंध-फूल वहावें.

श्रीमंडपदेवतायै नमः गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

असें म्हणून मंडपाला गंध, अक्षता व फुलें वहावीं.

## प्रोक्षण

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा ।
यः स्मरेत् पुंडरीकाक्षं स बाह्याभ्यंतरः शुचिः ॥

---

१. 'मी शुद्ध आहें, माझ्या मनांत कोणतेही अपवित्र विचार नाहींत' अशा भावनेनें व विश्वासानें श्रीविष्णूचें स्मरण करावें व पुढील पूजेला लागावें असा या प्रोक्षणविधीचा हेतु आहे.

[ कोणी पवित्र असो किंवा अपवित्र असो, कोणत्याही स्थितींत असो, कमला-सारखे ज्याचे डोळे अशा श्रीविष्णूचें जो स्मरण करतो तो सर्व तऱ्हेनें शुद्धच होतो. ]

असें म्हणून शंखांतील पाण्यानें स्वतःचें शरीर आणि पूजाद्रव्यें प्रोक्षण करावीं.

## अथ प्राणप्रतिष्ठा

**अस्य श्रीप्राणप्रतिष्ठामंत्रस्य । ब्रह्माविष्णुमहेश्वरा ऋषयः । ऋग्यजुःसामाथर्वाणि छंदांसि । पराप्राणशक्तिर्देवता । आं बीजं । ह्रीं शक्तिः । क्रों कीलकम् । अस्यां मूर्तौ प्राणप्रतिष्ठापने विनियोगः ।**

**ॐ आं ह्रीं क्रोम् ।**

**अस्यां मूर्तौ प्राणा इह प्राणाः । अस्यां मूर्तौ जीव इह स्थितः । अस्यां मूर्तौ सर्वेंद्रियाणि आगत्य सुखं चिरं तिष्ठंतु स्वाहा ।**

**श्रीसिद्धिविनायकाय नमोनमः ।**

[ या मूर्तींत येथें प्राण उत्पन्न होवोत. या मूर्तींत आतां जीव उत्पन्न झाला आहे. या मूर्तींत सर्व इंद्रियें येऊन चिरकाल वास करोत. ]

याप्रमाणें म्हणून मूर्तीच्या हृदयाला आपला उजवा हात लावावा व दूर्वांकुरांनीं मूर्तीच्या डोळ्यांना मध किंवा पाणी लावावें.

## अथ ध्यानम्

**एकदंतं शूर्पकर्णं गजवक्त्रं चतुर्भुजम् ।**
**पाशांकुशधरं देवं ध्यायेत् सिद्धिविनायकम्[1] ॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः ध्यायामि ।**

[ एकदन्त, शूर्पकर्ण, गजवक्त्र, चतुर्भुज, पाशांकुशधर अशा सिद्धिविनायक देवाचें ध्यान करावें. ]

असें म्हणून नमस्कार करावा.

---

१ श्रीसिद्धिविनायकाचें स्वरूप एक दांत बाहेर आलेला, सुपासारखे मोठे कान, हत्तीसारखें तोंड, चार हात आणि हातांत पाश, अंकुश हीं शस्त्रें अशा रीतीचें कल्पिलेलें आहे. यासंबंधाचें विवेचन या पुस्तकांतील पहिल्या भागांत केलें आहे.

## आवाहन[1]

आवाहयामि विघ्नेश सुरराजार्चितेश्वर ।
अनाथनाथ सर्वज्ञ पूजार्थं गणनायक ॥

**श्रीसिद्धिविनायकाय नमः आवाहयामि ।**

[ हे विघ्नें हरण करणाऱ्या, इंद्रादि देवांनीं पूजिलेल्या देवा, अनाथांच्या नाथा, सर्वज्ञा, गणनायका, मी तुला पूजेसाठीं बोलावीत आहें. ]

असें म्हणून हात जोडावे.

## आसन

विचित्ररत्नरचितं दिव्यास्तरणसंयुतम् ।
स्वर्णसिंहासनं चारु गृहाण सुरपूजित ॥

**श्रीसिद्धिविनायकाय नमः आसनार्थे अक्षतान् समर्पयामि ।**

[ सर्व देव ज्याचें पूजन करतात अशा देवा, चित्रविचित्र रत्नांनीं भूषविलेलें आणि ज्याच्यावर दिव्य अस्तर घातलेलें आहे अशा या सुवर्णसिंहासनावर तूं बैस. ]

असें म्हणून श्रीच्या मूर्तीच्या आसनावर अक्षता वहाव्या.

## पाद्य

सर्वतीर्थसमानीतं पाद्यं गंधादिसंयुतम् ।
विघ्नराज गृहाणेदं भगवन् भक्तवत्सल ॥

**श्रीसिद्धिविनायकाय नमः पाद्यं समर्पयामि ।**

---

१ या षोडशोपचार पूजेंत देवताध्यान झाल्यावर आवाहनापासून पुढच्या उपचारांसाठीं पुरुषसूक्तांतील "ॐ सहस्रशीर्षा०" इत्यादि १६ ऋचांपैकीं क्रमानें एकेक ऋचा एकेका उपचारासाठीं म्हणण्याचा सार्वत्रिक सांप्रदाय आहे. पण त्या ऋचांच्या अर्थाकडे पाहिलें असतां त्या त्या उपचाराशीं त्या ऋचेचा विशेष संबंध असल्याचें दिसणार नाहीं. त्यापेक्षां साध्या संस्कृत श्लोकांनीं हे उपचार केल्यानें देवतास्तवन होऊन पूजाही सुटसुटीत होईल म्हणून येथें फक्त संस्कृत श्लोकच दिले आहेत. ज्यांना पुरुषसूक्ताच्या ऋचा म्हणावयाच्या असतील त्यांच्यासाठीं वेगळ्या पोथ्या आहेतच.

[ हे विघ्नराजा, भक्तवत्सल भगवंता, ज्यांत गंध मिसळलेलें आहे असें हें सर्व तीर्थांचें उदक मी तुला अर्पण करीत आहें, त्याचा स्वीकार कर. ]

असें म्हणून फुलानें किंवा दूर्वांनीं गंध घातलेलें पाणी वहावें.

## अर्घ्य

अर्घ्यं च फलसंयुक्तं गंधपुष्पाक्षतैर्युतम् ।
गणाध्यक्ष नमस्तेऽस्तु गृहाण करुणानिधे ।
श्रीसिद्धिविनायकाय नमः अर्घ्यं समर्पयामि ।

[ हे गणाध्यक्षा, करुणासागरा, गंध, पुष्प आणि अक्षता यांनीं त्याचप्रमाणें फलानें युक्त असें अर्घ्य मी तुला अर्पण करीत आहें त्याचा स्वीकार कर. ]

असें म्हणून गंध, फूल, सुपारी आणि अक्षतायुक्त पाणी वहावें.

## आचमन

विनायक नमस्तुभ्यं त्रिदशैरभिवंदित ।
गंगाहृतेन तोयेन शीघ्रमाचमनं कुरु ॥
श्रीसिद्धिविनायकाय नमः आचमनं समर्पयामि ।

[ हे विनायका, सर्व देव तुला नमस्कार करतात. मी हें गंगेचें पाणी आणलेलें आहे तें घेऊन लौकर आचमन कर. ]

असें म्हणून आचमनासाठीं ताम्हनांतच पाणी सोडावें.

## स्नान

गंगादिसर्वतीर्थेभ्य आनीतं तोयमुत्तमम् ।
भक्त्या समर्पितं तुभ्यं स्नानायाभीष्टदायक ॥
श्रीसिद्धिविनायकाय नमः स्नानं समर्पयामि ।

[ हे अभीष्टदायका, गंगा आदिकरून तीर्थांचें हें उत्तम पाणी आणलेलें आहे] आणि मी भक्तिभावानें हें तुला अर्पण करीत आहें. याचा स्नानासाठीं स्वीकार कर.

असें म्हणून फुलानें किंवा दूर्वांकुरांनीं मूर्तीवर पाणी शिंपडावें.

## पंचामृतस्नान

श्रीसिद्धिविनायकाय नमः पंचामृतस्नानं समर्पयामि ।

दूध, दहीं, तूप, मध आणि साखर यांच्या मिश्रणाला पंचामृत म्हणतात. साध्या पाण्याच्या स्नानानंतर हे पदार्थ अंगाला लावून स्नान करणें हा श्रीमंतीचा उपचार आहे. अर्थात् भक्ताप्रमाणेंच देवालाही तो उपचार प्रिय असणारच, म्हणून वरप्रमाणें तयार केलेलें मिश्रण फुलानें किंवा दूर्वांकुरांनीं वहावें.

## शुद्धोदक व गंधोदकस्नान

**श्रीसिद्धिविनायकाय नमः शुद्धोदकस्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नानांतरेण गंधोदकस्नानं समर्पयामि । गंधोदकस्नानांतरेण आचमनीयं समर्पयामि[1] ।**

असें म्हणून पुनः शुद्ध पाणी व त्यानंतर गंधयुक्त पाणी फुलानें वहावें आणि नंतर एक पळीभर पाणी आचमनासाठीं म्हणून ताम्हनांत सोडावें.

## पूर्वाराधनार्पण

**श्रीसिद्धिविनायकाय नमः पूर्वाराधनार्थे गंधाक्षतपुष्पं धूपं दीपं पंचामृतशेषनैवेद्यं च समर्पयामि ।**

असें म्हणून गंध, अक्षता व फुलें मूर्तीच्या पायांवर वहावीं, धूप दाखवावा, नीरांजन ओंवाळावें व शिल्लक राहिलेल्या पंचामृताचा नैवेद्य दाखवावा.

**अनेन पूर्वाराधनेन श्रीसिद्धिविनायकदेवता प्रीयताम् ।**

[ या पहिल्या पूजेनें श्रीसिद्धिविनायक देवता संतुष्ट होवो ! ]

असें म्हणून नमस्कार करावा.

---

१ अंगावर पंचामृत घातल्यानंतर ओखटपणा जाण्यासाठीं पुनः शुद्ध पाण्याची –ऊन पाण्याची–सुद्धां आवश्यकता आहेच. म्हणून हे उपचार करावयाचे असतात. स्नानानंतर आचमन करण्याच्या पद्धतीला अनुसरून आचमन हा उपचार समर्पण करावयाचा असतो.

## महाभिषेकस्नानं[1]

ॐ नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि । त्वमेव केवलं कर्तासि । त्वमेव केवलं धर्तासि । त्वमेव केवलं हर्तासि । त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्मासि नित्यम् ॥ १ ॥

एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि ।
तन्नो दंती प्रचोदयात् ॥ २ ॥

नमो व्रातपतये नमो गणपतये नमः प्रमथपतये नमस्ते अस्तु लंबोदरायैकदंताय विघ्ननाशिने शिवसुताय वरदमूर्तये नमः ॥३॥

श्रीसिद्धिविनायकाय नमः महाभिषेकस्नानं समर्पयामि आचमनीयं च समर्पयामि ।

याप्रमाणें म्हणून दूर्वांकुरांनीं मूर्तीवर पाणी शिंपडावें.

## पुनः प्रतिष्ठापन

श्रीसिद्धिविनायकाय नमः महाभिषेकस्नानांते प्रतिष्ठासनं समर्पयामि । सुप्रतिष्ठितमस्तु[2] ।

असें म्हणून मूर्तीला अक्षता वहाव्या व नमस्कार करावा.

---

१ कोणत्याही देवतेच्या पूजेंत पूर्वाराधना व उत्तराराधना असे दोन भाग असतात. स्नानापर्यंतच्या उपचारांचा पूर्वाराधनेंत समावेश होतो. त्यानंतर महाभिषेक म्हणजे देवावर सतत धार धरण्याचा उपचार करतात. या उपचाराच्या वेळीं विशिष्ट देवतांचें विशिष्ट सूक्त असतें तें म्हणण्याची पद्धति आहे. श्रीगणपतीच्या पूजेंत गणपति-अथर्वशीर्ष म्हटलें जातें. त्यांतला कांहीं भाग आम्हीं येथें दिला आहे. गणपति हा अगदीं मूळ ॐकार ब्रह्मस्वरूप आहे, सर्व विश्व त्याच्यापासून उत्पन्न झालें आहे. तो भक्तांना पावतो, त्यांचीं संकटें दूर करतो, त्यांचे वांछित मनोरथ पूर्ण करतो, इत्यादि वर्णन या अथर्वशीर्षांत आहे. सवड असेल त्यांनीं सबंध अथर्वशीर्ष म्हणावें व शेवटीं पुरुषसूक्त म्हणून महाभिषेक संपवावा.

२ स्नान आटोपल्यावर पुनः आसनस्थ होण्याबद्दलची ही प्रार्थना आहे. यानंतर उत्तराराधनेला सुरुवात होते.

## वस्त्रोपवस्त्रसमर्पण

**रक्तवस्त्रयुगं देव दिव्यं कांचनसंभवम् ।**
**सर्वप्रद गृहाणेदं लंबोदर हरात्मज ॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः वस्त्रार्थे कार्पासवस्त्रं समर्पयामि ।**

[ हे लंबोदरा, शिवपुत्रा, सर्व कांहीं प्राप्त करून देणाऱ्या देवा ! हें दिव्य सोन्यासारख्या कांतीचें तांबडें वस्त्र मी तुला देत आहें त्याचा स्वीकार कर. ]

असें म्हणून कापसाचीं वस्त्रें समर्पण करावीं.

**राजतं ब्रह्मसूत्रं च कांचनं चोत्तरीयकम् ।**
**गृहाण चारु सर्वज्ञ भक्तानां वरदो भव ॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः उपवस्त्रार्थे यज्ञोपवीतं समर्पयामि ।**

[ हे सुंदर व सर्वज्ञ देवा, हें सोन्यारुप्याचें उत्तरीय वस्त्र तुला अर्पण करीत आहें, त्याचा स्वीकार कर आणि आम्हां भक्तांना पाव. ]

असें म्हणून जानवें घालावें.

## चंदन ( विलेपन )

**कस्तूरीरोचनाचंद्रकुंकुमैश्च समन्वितम् ।**
**विलेपनं सुरश्रेष्ठ चंदनं प्रतिगृह्यताम् ॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः विलेपनार्थे चंदनं समर्पयामि ।**

---

१ श्रीगणपतीला तांबडा रंग प्रिय आहे म्हणून त्याचें वस्त्रही तांबड्या रंगाचेंच असावें असें सांगितलें आहे. प्रत्यक्ष वस्त्राऐवजीं कापूस पिंजून त्याची लांब पट्टी घेऊन तिला मधून मधून कुंकूं अथवा पिंजर लावून बनविलेलीं दोन वस्त्रें अर्पण केलीं तरी चालतात. किंबहुना हाच प्रकार विशेष रूढ व बिनखर्चाचा आहे.

२ उत्तरीय म्हणजे अंगावर घेण्याचें वस्त्र. याचें प्रतीक म्हणून जानवें घालतात. तें मूर्तीच्या डाव्या खांद्यावरून व उजव्या कांखेखालून येईल असें घालावें. आणखी कांहीं अलंकार घालावयाचे असल्यास याच वेळीं घालावे.

३ श्रीगणपतीला रक्तचंदन प्रिय आहे, म्हणून रक्तचंदनाचाच टिळा लावावा. तें मिळत नसेल तेथें कुंकुम अथवा पिंजर घालून तयार केलेलें गंध लावावें.

[ कस्तुरी, केशर, कुंकुम इत्यादिकांनीं युक्त असें चंदन, हे सुरनायका, मी तुला लेपन करीत आहें, त्याचा स्वीकार कर. ]

असें म्हणून मूर्तीला गंधाचा टिळा लावावा व वर अक्षता लावाव्या.

याच वेळीं शेंदूर, अबीर, बुक्का इत्यादि परिमल म्हणजे सुवासिक द्रव्येंही अर्पण करावीं.

## पुष्पसमर्पण

**माल्यादीनि सुगंधीनि मालत्यादीनि वै प्रभो।**
**मयार्पितानि पूजार्थं पुष्पाणि प्रतिगृह्यताम्॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः पूजार्थं पुष्पाणि समर्पयामि।**

[ माली, मालती इत्यादि सुगंधी पुष्पें, हे प्रभो! मी तुला पूजार्थ अर्पण करीत आहें, त्यांचा स्वीकार कर. ]

असें म्हणून फुलें वहावीं.[1]

## दूर्वा व पत्री समर्पण

**श्रीसिद्धिविनायकाय नमः एकविंशतिदूर्वांकुरान् समर्पयामि। नानाविधपत्राणि च समर्पयामि।**

यानंतर एकवीस दूर्वा[2] व पत्री (निरनिराळया झाडांचीं व झुडुपांचीं पानें)

---

१ श्रीगणपतीला वस्त्र व चंदन यांप्रमाणेंच फुलेंही तांबड्या रंगाचींच ज्यास्त प्रिय आहेत. म्हणून तसलीं फुलें वहावीं.

२ या एकवीस दूर्वा वाहण्याचा प्रकार पुढीलप्रमाणें आहेः– ॐ गणाधिपाय नमः दूर्वायुग्मं समर्पयामि। ॐ उमापुत्राय नमः दूर्वायुग्मं०। ॐ अघनाशनाय नमः दूर्वायुग्मं०। ॐ एकदन्ताय नमः दूर्वायुग्मं०। ॐ इभवक्त्राय नमः दूर्वायुग्मं०। ॐ मूषकवाहनाय नमः दूर्वायुग्मं०। ॐ विनायकाय नमः दूर्वायुग्मं०। ॐ ईशपुत्राय नमः दूर्वायुग्मं०। ॐ सर्वसिद्धिप्रदायकाय नमः दूर्वायुग्मं०। ॐ कुमारगुरवे नमः दूर्वायुग्मं०॥ याप्रमाणें प्रत्येक नांवाचा उच्चार करून प्रत्येकीं दोन दोन आणि शेवटीं

**गणाधिप नमस्तेऽस्तु उमापुत्राघनाशन।**
**एकदन्तेभवक्त्रेति तथा मूषकवाहन॥ १॥**
**विनायकेशपुत्रेति सर्वसिद्धिप्रदायक।**
**कुमारगुरवे तुभ्यं पूजयामि प्रयत्नतः॥ २॥**

हे श्लोक ह्मणून शेवटची एक दूर्वा वहावयाची. हें दूर्वासमर्पण तांबूलसमर्पणानंतर महानीराजन दीपाच्या पूर्वी करण्याचाही प्रघात आहे.

चाहावी. गणपतीला तुळसी वाहणें वर्ज्य आहे. पण फक्त गणेशचतुर्थीच्या दिवशीं इतर पत्रीबरोबर 'गजकर्णाय नमः' असें म्हणून तुळसीदल वाहण्याचा परिपाठ आहे.

## धूपसमर्पण[1]

**दशांगं गुग्गुलं धूपं सुगंधं च मनोहरम् ।**
**गृहाण सर्वदेवेश उमापुत्र नमोऽस्तु ते ॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः धूपं समर्पयामि ।**

[ हे देवेशा, उमापुत्रा, हा सुगंधी मनोहर धूप मी तुला अर्पण करीत आहें त्याचा स्वीकार कर. तुला नमस्कार असो. ]

असें म्हणून धूप दाखवावा.

## दीपसमर्पण

**सर्वज्ञ सर्वलोकेश त्रैलोक्यतिमिरापह ।**
**गृहाण मंगलं दीपं रुद्रप्रिय नमोस्तु ते ॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः दीपं समर्पयामि ।**

[ हे सर्वज्ञा, सर्वलोकेशा, त्रैलोक्यांतील अंधार दूर करणाऱ्या रुद्रप्रिया देवा, हा मंगल दीप मी तुला दाखवीत आहें, याचा स्वीकार कर. ]

असें म्हणून नीरांजन ओंवाळावें. नीरांजन ओंवाळतांना घंटा वाजवावी.

## नैवेद्यसमर्पण

**नानाखाद्यमयं दिव्यं नैवेद्यं ते निवेदितम् ।**
**मया भक्त्या शिवापुत्र गृहाण गणनायक ॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः नैवेद्यं समर्पयामि ।**

---

१ धूपाच्या भांड्यांत निखारे घालून त्यावर धूप व इतर सुगंधी द्रव्यें घालावीं म्हणजे त्यांचा वास दरवळतो व सर्व वातावरण प्रसन्न होतें. उदबत्त्या आतां सर्वत्र मिळतातच. हा धूप-उपचार करतांना घंटा वाजवावी.

[ हे शिवापुत्रा, नाना प्रकारच्या खाद्यपदार्थांनीं युक्त असा हा नैवेद्य[1] मी तुला दाखवीत आहें त्याचा स्वीकार कर. ]

असें म्हणून नैवेद्य समर्पण करावा. तो करतांना ॐ प्राणाय स्वाहा। अपानाय स्वाहा। व्यानाय स्वाहा। उदानाय स्वाहा। समानाय स्वाहा। ब्रह्मणे स्वाहा। असें एकेक वेळां म्हणून घांस देतात त्याप्रमाणें हातानें खूण करीत जावी. नैवेद्य समर्पणानंतर 'हस्तप्रक्षालनं समर्पयामि' असें म्हणून ताम्हनांत पाणी सोडावें. याचा अर्थ 'हात धुण्यासाठीं मी तुला पाणी देत आहें त्याचा स्वीकार कर' असा आहे.

## फलसमर्पण

**इदं फलं मया देव स्थापितं पुरतस्तव।**
**तेन मे सुफलावाप्तिर्भवेत् जन्मनि जन्मनि॥**

**श्रीसिद्धिविनायकाय नमः फलार्थं नारिकेलफलं ( पूगीफलं ) समर्पयामि।**

[ हे देवा, हें फळ मी तुझ्यापुढें ठेवीत आहें. या योगानें जन्मोजन्मीं माझे मनोरथ पूर्ण होवोत. ]

असें म्हणून देवापुढें नारळ अथवा सुपारी ठेवून नमस्कार करावा.

## तांबूलसमर्पण

**पूगीफलं महद्दिव्यं नागवल्ल्या समन्वितम्।**
**कर्पूरैलासमायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम्॥**
**श्रीसिद्धिविनायकाय नमः तांबूलं समर्पयामि।**

[ विड्याचीं पानें, सुपारी, कापूर, वेलदोडे इत्यादि पदार्थांनीं युक्त असा हा विडा, देवा, मी तुला अर्पण करीत आहें, त्याचा स्वीकार होवो. ]

असें म्हणून देवाला विडा समर्पण करावा. याच वेळीं 'श्रीसिद्धिविनायकाय नमः दक्षिणां समर्पयामि,' असें म्हणून यथाशक्ति दक्षिणाही अर्पण करावी.

---

१ **पंचखाद्य** हें अगदीं साधें 'प्रसादसाधन' आहे. (१) हरभऱ्याची डाळ, काजू बिया किंवा शेंगदाणे (२) पोहे, चुरमुरे किंवा लाह्या (३) नारळ (४) गूळ किंवा साखर आणि (५) तीळ इतके जिन्नस एकत्र केले कीं हें तयार होतें आणि हे जिन्नस कुठेंही स्वल्प किंमतींत मिळूं शकतात.

## प्रदक्षिणा[1]

यानि कानि च पापानि जन्मांतरकृतानि च ।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणपदे पदे ॥
श्रीसिद्धिविनायकाय नमः प्रदक्षिणां समर्पयामि ।

[ या जन्मांत किंवा पूर्वजन्मीं माझ्या हातून जीं कांहीं पापें झालीं असतील तीं या प्रदक्षिणेच्या प्रत्येक पावलागणिक नाहींशीं होवोत ].

**असें म्हणून प्रदक्षिणा घालावी.**

## नमस्कार

नमस्ते विघ्नसंहर्त्रे नमस्ते ईप्सितप्रद ।
नमस्ते देवदेवेश नमस्ते गणनायक ॥
श्रीसिद्धिविनायकाय नमः नमस्करोमि ।

[ विघ्नहरणकर्त्या देवा, तुला नमस्कार असो. इच्छिलेलें प्राप्त करून देणाऱ्या देवा, देवेशा, गणनायका, तुला पुनः पुनः नमस्कार असो. ]

**असें म्हणून देवाला साष्टांग नमस्कार घालावा.**

**साष्टांग नमस्कार** म्हणजे दोन हात, दोन पाय, डोकें, छाती व दोन गुडघे हीं शरीराचीं आठ अंगें जमिनीला टेंकून केलेला नमस्कार.

## महानीराजनदीप व आरती

**यानंतर नीरांजनांत कापूर पेटवून आरत्या म्हणाव्या. आरत्या म्हणतांना सर्वांनीं उभें रहावें. मंजुळ वाद्यें वाजवावीं व एकंदर वातावरण भक्तियुक्त व प्रसन्न राहील अशा रीतीनें वागावें.**

## मंत्रपुष्प

**ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ॥**

राष्ट्रीय प्रार्थना—

---

१ प्रदक्षिणा ही समोरच्या देवमूर्तीच्या उजवीकडून डावीकडे जाऊन पुन्हां मूळजागीं आल्यानें पुरी होते. अशा रीतीनें प्रदक्षिणा करण्याला जागा नसेल तर स्वतःच्या भोवतीं उजव्या बाजूनें फिरूनही प्रदक्षिणा करतां येईल.

## गणपति

ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने। नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान् कामकामाय मह्यं। कामेश्वरो वैश्रवणो ददातु॥ कुबेराय वैश्रवणाय। महाराजाय नमः॥

ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यांईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति॥ तदप्येष श्लोकोभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे॥ आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति॥

सर्वशक्तिमान राजाधिराज व उपासकांची प्रार्थना ऐकून घेणाऱ्या प्रभूला आम्ही सर्व उपासक नमस्कार करतों! तो आमची मनकामना पूर्ण करो! त्या राजाधिराज महाराजाला आम्ही प्रणिपात करतों! आम्हां सर्वांचें कल्याण होवो! आमचें साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठ्य राज्य, माहाराज्य, अधिराज्य समुद्रापर्यंत वाढो! आमचें स्वराज्य सर्व भूमंडळावर पसरो! आम्हांला पूर्ण आयुष्य प्राप्त होवो! आणि अनंत काळपर्यंत सर्व पृथ्वीवर आमचें एकछत्री राज्य होवो!

एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि। तन्नो दन्ती (दन्तिः) प्रचोदयात्॥

आम्हीं सर्व एकदन्ताला जाणतों. वक्रतुंडाचें आम्हीं ध्यान करतों. तो दन्ती आम्हां सर्वांना योग्य सन्मार्गानें जाण्याची प्रेरणा करो.

श्रीसिद्धिविनायकाय नमः मंत्रपुष्पं समर्पयामि

असें म्हणून गंध, अक्षता व फुलें ओंजळींत घेऊन मूर्तीला वहावीं. या वेळीं जमलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषानें गंध-अक्षता-फूल देवाला वाहून नमस्कार करावा.

### प्रार्थना

आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम्।
पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर॥ १॥

मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर ।
यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ॥ २ ॥
अपराधसहस्राणि क्रियंतेऽहर्निशं मया ।
दासोऽहमिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वर,
क्षमस्व परमेश्वर, क्षमस्व परमेश्वर ॥ ३ ॥

असें म्हणून हात जोडावे.

**अनेन यथाज्ञानेन यथामीलितोपचारद्रव्यैः कृतपूजनेन भगवान् श्रीसिद्धिविनायकः प्रीयताम् ।**

**ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु । विष्णवे नमो विष्णवे नमो विष्णवे नमः ॥**

असें म्हणून डाव्या हातांतील पळीनें उजव्या हातांत पाणी घेऊन ताम्हनांत सोडावें. शेवटीं तीर्थ व देवाला पूर्वीं दाखविलेला नैवेद्य प्रसाद म्हणून सर्वांना वांटावा.

# उत्तरपूजा

ही श्रीगजाननाच्या मूर्तीचें विसर्जन करण्यापूर्वीं करावयाची असते. हिचा त्रोटक विधि पुढीलप्रमाणें—

प्रथम 'केशवादि' चोवीस नांवांचा उच्चार व प्राणायाम वगैरे झाल्यावर संकल्प करतांना

**"तिथिर्विष्णुस्तथा वारो........श्रीसिद्धिविनायकदेवताप्रीत्यर्थं पंचोपचारपूजनं मूर्तिविसर्जनं च करिष्ये"**

असें म्हणून ताम्हनांत पाणी सोडावें. व ध्यानाचा श्लोक म्हणून नंतर पंचोपचार पूजा करावी. म्हणजे गंध, पुष्प, धूप, दीप व नैवेद्य एवढे उपचार तत्संबंधीं श्लोक म्हणून मूर्तीला वाहावे. आणि शेवटीं प्रदक्षिणा, नमस्कार, आरती व मंत्रपुष्प करून "अनेन उत्तरपूजया भगवान् श्रीसिद्धिविनायकदेवता प्रीयताम्" असें म्हणून ताम्हनांत पाणी सोडावें.

यानंतर देवापुढें नारळ किंवा सुपारी ठेवून कुटुंबांतील सर्व मंडळींनीं उभें राहून सर्वांचें कल्याण करण्याविषयीं देवाची प्रार्थना करावी.

नंतर ज्या जलाशयांत मूर्तीचें विसर्जन करावयाचें असेल त्या जलाशयापर्यंत मूर्ति नेण्याची व्यवस्था करून मूर्ति हालवितांना पुढील श्लोक म्हणावा—

**"यान्तु देवगणाः सर्वे पूजामादाय पार्थिवीम् ।**
**इष्टकामप्रसिध्यर्थं पुनरागमनाय च ॥"**

असें म्हणून मूर्तीच्या मस्तकावर अक्षता वहाव्या आणि 'मंगलमूर्ति मोरया !' असा घोष करून मूर्ति उचलून खालीं घ्यावी व जलाशयांत नेऊन विसर्जन करावी.

त्यानंतर घरीं येऊन सर्वांना गूळखोबऱ्याचा प्रसाद देऊन संतुष्ट करावें.

**शुभं भवतु.**

★

# श्रीगणेश-अष्टोत्तरशतनामावलि

श्रीगणपतीला दूर्वा किती प्रिय आहेत हें मागें सांगितलेंच आहे. पूजेच्या वेळीं फुलें वाहून झाल्यावर त्याच्या अनेक नांवांपैकीं एकेका नांवाचा उच्चार करून एकेक दूर्वांकुर वाहाण्याची पद्धति आहे. त्यासाठीं अशीं एक हजार नांवें एकत्र करून त्यांची **सहस्रनामावलि** आणि एकशें आठ नांवें एकत्र करून त्यांची **अष्टोत्तरशतनामावलि** बनविलेली आहे. या नामावल्या निर्णयसागर प्रेसनें छापलेल्या आहेत. ज्यांना सवड असेल त्यांनीं सहस्र दूर्वांकुर वहावे. पण ज्यांना तेवढी सवड नसेल त्यांनीं निदान एकशें आठ दूर्वा तरी अवश्य वाहाव्या.

पुढील नामावलींत हीं १०८ नांवें दिलीं आहेत. प्रत्येक नांवाचा उच्चार करतांना आरंभीं ॐ व शेवटीं नमः म्हणावें. उदा० ॐ विघ्नेशाय नमः । ॐ विश्ववरदाय नमः इ०

## नामावलि-

| | | |
|---|---|---|
| १ विघ्नेशाय नमः । | २ विश्ववरदाय नमः । | ३ विश्वचक्षुषे नमः । |
| ४ जगत्प्रभवे नमः । | ५ हिरण्यरूपाय नमः । | ६ सर्वात्मने नमः । |
| ७ ज्ञानरूपाय नमः । | ८ जगन्मयाय नमः । | ९ ऊर्ध्वरेतसे नमः । |
| १० महाबाहवे नमः । | ११ अमेयाय नमः । | १२ अमितविक्रमाय नमः । |
| १३ वेदवेद्याय नमः । | १४ महाकालाय नमः । | १५ विद्यानिधये नमः । |
| १६ अनामयाय नमः । | १७ सर्वज्ञाय नमः । | १८ सर्वगाय नमः । |
| १९ शांताय नमः । | २० गजास्याय नमः । | २१ चित्तेश्वराय नमः । |
| २२ विगतज्वराय नमः । | २३ विश्वमूर्तये नमः । | २४ अमेयात्मने नमः । |

२५ विश्वाधाराय नमः। २६ सनातनाय नमः। २७ सामगाय नमः।
२८ प्रियाय नमः। २९ मंत्रिणे नमः। ३० सत्वाधाराय नमः।
३१ सुराधीशाय नमः। ३२ समस्तसाक्षिणे नमः। ३३ निर्द्वंद्वाय नमः।
३४ निर्लोकाय नमः। ३५ अमोघविक्रमाय नमः। ३६ निर्मलाय नमः।
३७ पुण्याय नमः। ३८ कामदाय नमः। ३९ कांतिदाय नमः।
४० कामरूपिणे नमः। ४१ कामपोपिणे नमः। ४२ कमलाक्षाय नमः।
४३ गजाननाय नमः। ४४ सुमुखाय नमः। ४५ शर्मदाय नमः।
४६ मूषकाधिपवाहनाय ४७ शुद्धाय नमः। ४८ दीर्घतुंडाय नमः।
४९ श्रीपतये नमः। ५० अनंताय नमः। ५१ मोहवर्जिताय नमः।
५२ वक्रतुंडाय नमः। ५३ शूर्पकर्णाय नमः। ५४ परमाय नमः।
५५ योगीशाय नमः। ५६ योगधाम्ने नमः। ५७ उमासुताय नमः।
५८ आपद्धंत्रे नमः। ५९ एकदंताय नमः। ६० महाग्रीवाय नमः।
६१ शरण्याय नमः। ६२ सिद्धसेनाय नमः। ६३ सिद्धवेदाय नमः।
६४ करुणाय नमः। ६५ सिद्धाय नमः। ६६ भगवते नमः।
६७ अव्यग्राय नमः। ६८ विकटाय नमः। ६९ कपिलाय नमः।
७० ढुंढिराजाय नमः। ७१ उग्राय नमः। ७२ भीमोदराय नमः।
७३ शुभाय नमः। ७४ गणाध्यक्षाय नमः। ७५ गणेशाय नमः।
७६ गणाराध्याय नमः। ७७ गणनायकाय नमः। ७८ ज्योतिःस्वरूपाय न०
७९ भूतात्मने नमः। ८० धूम्रकेतवे नमः। ८१ अनुकूलाय नमः।
८२ कुमारगुरवे नमः। ८३ आनंदाय नमः। ८४ हेरंबाय नमः।
८५ वेदस्तुताय नमः। ८६ नागयज्ञोपवीतिने न० ८७ दुर्धर्षाय नमः।
८८ बालदूर्वांकुरप्रियाय ८९ भालचंद्राय नमः। ९० विश्वधात्रे नमः।
९१ शिवपुत्राय नमः। ९२ विनायकाय नमः। ९३ लीलासेविताय नमः
९४ पूर्णाय नमः। ९५ परमसुंदराय नमः। ९६ विघ्नांधकाराय नमः।
९७ सिंदूरवदनाय नमः। ९८ नित्याय नमः। ९९ विभवे नमः।
१०० प्रथमपूजिताय न० १०१ दिव्यपादाब्जाय न० १०२ भक्तमंदराय नमः।
१०३ शूरमहाय नमः। १०४ रत्नसिंहासनाय न० १०५ मणिकुंडलमंडिताय०
१०६ भक्तकल्याणाय० १०७ कल्याणगुरवे नमः। १०८ सहस्रशीर्ष्णे नमः।

महागणपतये नमो नमः।

# आरत्या व पदें

१

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ॥ नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥ सर्वांगीं सुंदर उटि शेंदूराची ॥ कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ जय देव जय देव जय मंगलमूर्ति । दर्शनमात्रें मनःकामना पुरती ॥ जय देव० ॥ १ ॥ रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ॥ चंदनाची उटी कुंकुम केशरा ॥ हिरेजडित मुकुट शोभतो बरा ॥ रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ जय देव० ॥ २ ॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ॥ सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥ दास रामाचा वाट पाहे सदना ॥ संकटीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवन्दना ॥ जय देव० ॥ ३ ॥

२

नाना परिमळ दूर्वा शेंदूर शमिपत्रें ॥ लाडू मोदक अन्नें परिपूरित पात्रें ॥ ऐसें पूजन केल्या बीजाक्षरमंत्रें ॥ अष्टहि सिद्धी नवनिधि देसी क्षणमात्रें ॥ जय देव जय देव जय मंगलमूर्ति ॥ तूझे गुण वर्णाया मज कैंची स्फूर्ति ॥ जय देव० ॥ १ ॥ तूझें ध्यान निरंतर जे कोणी करिती ॥ त्यांचीं सकलहि पापें विघ्नेंही हरती ॥ वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती ॥ सर्वहि पावुनि अंतीं भवसागर तरती ॥ जय देव० ॥२॥ शरणागत सर्वस्वें भजती तव चरणीं ॥ कीर्ति तयांची राहे जोंवर शशितरणी ॥ त्रैलोक्यीं ते विजयी अद्भुत हे करणी ॥ गोसावीनंदन रत नामस्मरणीं ॥ जय देव० ॥ ३ ॥

## ३

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको ॥ दोंदिल लाल बिराजे सुत गौरीहरको ॥ हाथ लिये गुडलड्डू सांई सुरवरको ॥ महिमा कहे न जाय लागत हूं पदको ॥ जय जय श्रीगणराज विद्यासुखदाता ॥ धन्य तुमारो दर्शन मेरा मन रमता ॥ १ ॥ अष्टौ सिद्धी दासी संकटको वैरी ॥ विघनविनाशन मंगलमूरत अधिकारी ॥ कोटी सुरजप्रकाश ऐसी छब तेरी ॥ गंडस्थळ मदमस्तक झूले शशिबहरी ॥ जय जय० ॥ २ ॥ भावभगतसे कोई शरणागत आवे ॥ संतत संपत सबही भरपूर पावे ॥ ऐसे तुम महाराज मोको अतिभावे ॥ गोसावीनंदन निशिदिन गुण गावे ॥ जय जय० ॥ ३ ॥

*　　*　　*　　*

घालीन लोटांगण वंदीन चरण डोळयांनीं पाहीन रूप तुझें । प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन भावें ओंवाळिन म्हणे नामा ॥ १ ॥ त्वमेव माता पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥ त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देव देव ॥ २ ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् । करोमि यद्यत्सकलं परस्मै गजाननायेति समर्पयामि ॥ ३ ॥

मंगलमूर्ति मोरया

# पद

## १

मंगलमूर्ति ! तुज स्मरतां विघ्नें हरती ॥ धृ० ॥

तुजला घालिन मंगल स्नान ।
पिवळा पीतांबर नेसविन ।
रत्नजडित मुगुट चढवीन ।
शालू हा वरती ॥ १ ॥

मोदक लाडू आणि पक्वान्न ।
पंचामृतही तुज अर्पीन ।
चंपकपुष्प दीप सुवर्ण ।
दूर्वा वरती ॥ २ ॥

केसरी गणपति प्रसन्न झाला ।
सत्वर यशोदेसी पावला ।
तिचा कृष्ण सुबुद्धचि झाला ।
धन्यचि कीर्ति ॥ ३ ॥

## २

मन विमल करुनि आजि गाऊं या ॥ धृ० ॥
मंगलकारक तो सुखदायक सिद्धिविनायक
गाऊं या ॥ १ ॥
वैरभाव मद मत्सर त्यजुनी सकलगुणैक
गाऊं या ॥ २ ॥
मुनिजननायक भवभयहारक तो सुखकारक
गाऊं या ॥ ३ ॥

# नमन–प्रार्थना

नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने ।
यस्यागस्त्यायते नाम विघ्नसागरशोषणे ॥ १ ॥

❦ ❦ ❦

प्रारंभीं विनती करूं गणपती विद्याद्‌यासागरा ।
अज्ञानत्व हरूनि बुद्धिमति दे आराध्य मोरेश्वरा ॥
चिंता क्लेश दरिद्र दुःख अवघें देशांतरा पाठवीं ।
हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहू तोषवीं ॥ १ ॥

❦ ❦ ❦

पिता माता बंधू तुजविण असे कोण मजला ।
बहू मी अन्यायी परि सकलही लाज तुजला ॥
न जाणें मी कांहीं जप-तप तशा पूजनरिती ।
कृपादृष्टीं पाहें शरण तुज आलों गणपती ॥ २ ॥

म. ग्रं. सं. ठाणे, ...
अ. क्र. 20.1.L ...
...

पब्लिशर–सत्यभामाबाई पांडुरंग
प्रिंटर–रामचंद्र येसू शेडगे

निर्णयसागर प्रेस,
२६।२८ कोलभाट स्ट्रीट, मुंबई